सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ८० वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि. १७ एप्रिल २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## वक्फ कायद्यातील दोन कलमांच्या अंमलबजावणीला स्थगिती, सर्वोच्च न्यायालयाने दिले अंतरिम आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७नवी दिल्ली**

केंद्र सरकारने नुकत्याच संपलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या शेवटी लोकसभा व राज्यसभेत वक्फ विधेयक मंजूर करून घेतलं. यानंतर राष्ट्रपतींच्य स्वाक्षरीनंतर त्याचं कायद्यात रुपांतर झालं. पण या विधेयकाविरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल झाल्यानंतर त्यावर सविस्तर सुनावणी सुरू झाली. या सुनावणीदरम्यान आज सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला महत्त्वपूर्ण निर्देश दिले आहेत. वक्फ कायद्यातील दोन कलमांच्या अंमलबजावणीवर केंद्र सरकारच्या विनंतीनुसार तात्पुरती स्थगिती आणण्याचे निर्देश न्यायालयाने दिले आहेत.




आज सर्वोच्च न्यायालयात केंद्र सरकारने न्यायालयाला दोन मुद्द्यांवर आश्वासन दिलं आहे. त्यानुसार पुढील सुनावणी होईपर्यंत नव्या कायद्यानुसार बाहेरील सदस्यांची वक्फ बोर्डावर नियुक्ती केली जाणार नाही. त्याशिवाय, वक्फ बोर्डानं एखादी मालमत्ता वक्फ बोर्डाची असल्याचं जाहीर केलं असेल, तर त्यात पुढील सुनावणीपर्यंत हस्तक्षेप करणार नाही. या भूमिकेवर सर्वोच्च न्यायालयानं मंजुरी दिली असून येत्या ७ दिवसांत केंद्र सरकारला या मुद्द्यांवर भूमिका सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. भारताचे सरन्यायाधीश संजीव खन्ना, न्यायमूर्ती संजय कुमार व न्यायमूर्ती के. व्ही. विश्वनाथन यांच्या खंडपीठासमोर या याचिकेवर सुनावणी झाली.

**फक्त पाच याचिकांवरच सुनावणी होईल**

दरम्यान, सर्वोच्च न्यायालयात वक्फ कायद्यावर आक्षेप घेणाऱ्या जवळपास १५० हून अधिक याचिका दाखल झाल्या आहेत. याचा उल्लेख करत सर्वोच्च न्यायालयाने यातल्या फक्त पाच याचिकाच प्रातिनिधिक म्हणून स्वीकारल्या जाऊन त्यावरच सुनावणी घेतली जाईल. यासंदर्भात याचिकाकर्त्यांनी सर्व याचिकांमधून पाच याचिका प्रातिनिधिक म्हणून निवडून न्यायालयाला सादर करण्यास सहमती दर्शवली असल्याचंही न्यायालयानं यावेळी नमूद केलं.

## लोकांनी हिंदी देखील शिकली पाहिजे, नव्या शैक्षणिक धोरणाचं देवेंद्र फडणवीसांकडून समर्थन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७ मुंबई**

महाराष्ट्रात इयत्ता पहिलीपासूनच हिंदी भाषा शिकण्याच्या अनिवार्यतेवर नुकतंच शिक्कामोर्तब करण्यात आलं आहे. 'राज्य शालेय अभ्यासक्रम आराखडा २०२४'नुसार, मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळांमधील पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांना मराठी आणि इंग्रजीसह हिंदी ही तृतीय भाषा म्हणून शिकावी लागणार आहे. अन्य माध्यमांच्या शाळांमध्ये पहिली ते पाचवीसाठी माध्यम भाषा, मराठी आणि इंग्रजी अशा तीन भाषा असणार आहेत. येत्या जून महिन्यापासून नवं शैक्षणिक वर्ष सुरू होत असून या



वर्षापासूनच नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी केली जाणार आहे. मात्र, या नव्या शैक्षणिक धोरणाला विरोध होऊ लागला आहे.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेसह मराठी भाषेसाठी लढणाऱ्या संघटनांनी या शैक्षणिक धोरणावर आक्षेप घेतला आहे. दरम्यान, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या धोरणाचं समर्थन केलं आहे. फडणवीस म्हणाले, महाराष्ट्रात मराठी भाषा ही प्रत्येकाला आली पाहिजे. त्याचप्रमाणे देशात एक संपर्कसूत्र तयार करण्यासाठी हिदी भाषेचा पर्याय आहे. संपर्कसुत्राची भाषा म्हणून लोकांनी हिदी भाषा शिकली पाहिजे.

**देशात एक संपर्काची भाषा असावी : फडणवीस**

देवेंद्र फडणवीस म्हणाले, आपण यापूर्वीच नवीन शैक्षणिक धोरण लागू केलं आहे. त्यामुळे यात कुठलेही नवीन निर्णय घेतलेले नाहीत. महाराष्ट्रात प्रत्येकाला मराठी आलीच पाहिजे, हा आपला आग्रह आहे. तसेच देशात एक संपर्कसुत्र तयार करण्यासाठी हिंदी ही एक भाषा आहे जी संपर्कसुत्राची भाषा होऊ शकते. त्यामुळे हिंदी देखील लोकांनी शिकली पाहिजे, अशा प्रकारचा यात आमचा प्रयत्न आहे.

**इतर भाषासुद्धा आल्या पाहिजेत : देवेंद्र फडणवीस**

मुख्यमंत्री म्हणाले, कोणाला इंग्रजी भाषा शिकायची असेल तर त्यांना इंग्रजी शिकता येईल. अन्य कुठल्या भाषा शिकायच्या असतील तर इतर भाषा शिकण्यापासून कोणलाही मनाई नाही. सर्वांना मराठी आली पाहिजे. तसेच आपल्या देशातील इतर भाषासुद्धा आल्या पाहिजेत. याबाबत केंद्र सरकारने विचार केला आहे. आपल्या देशात संपर्काची एक भाषा असावी असा केंद्र सरकारचा विचार आहे. त्यासाठी हा प्रयत्न केला आहे.

## मराठी शाळांमध्ये तिसरी भाषा म्हणून हिंदी सक्तीची करण्यास मनसेचा विरोध

### आंदोलन करण्याचा दिला इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७ मुंबई**

राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेने (एससीईआरटी) 'राज्य शालेय अभ्यासक्रम आराखडा २०२४' तयार केला असून मराठी आणि इंग्रजी माध्यमांच्या शाळांतील इयत्ता पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांना मराठी आणि इंग्रजीसह हिंदी ही तृतीय भाषा म्हणून सक्तीची करण्यात आली आहे. तर अन्य माध्यमांच्या शाळांमध्ये पहिली ते पाचवीसाठी माध्यम भाषा, मराठी आणि इंग्रजी अशा तीन भाषा असणार आहेत. दक्षिणेतील राज्य हिंदी भाषेच्या सक्तीच्या विरोधात आक्रमक भूमिका घेत आहेत. त्याचप्रमाणे आता महाराष्ट्र नवनिर्माण सेनेनेही या निर्णयाच्या विरोधात भूमिका घेतली आहे.



मनसेचे सरचिटणीस संदीप देशपांडे यांनी माध्यमांशी संवाद साधताना म्हटले की, हिंदी ही भारताची राजभाषा नाही. संविधानातही तसे नमूद केलेले आहे. दोन-तीन राज्यांची ती भाषा असू शकते. १९४७ साली भारत स्वतंत्र झाल्यानंतर भाषावार प्रांतरचना करण्यात आली. प्रत्येक राज्याची वेगळी भाषा आहे. आता दुसऱ्या राज्याची भाषा तुम्ही आमच्यावर लादू शकत नाही, याला आमचा ठाम विरोध आहे. महाराष्ट्रात मराठी भाषा अनिवार्य असावी. तिसरी भाषा ऐच्छिक असायला हरकत नाही. पण ती अनिवार्य करणे, याला आमचा विरोध आहे.महाराष्ट्रात मराठीला प्राधान्य द्यावे का? अशी जर चर्चा होत असेल तर हे महाराष्ट्राचे दुर्दैव आहे, अशीही खंत संदीप देशपांडे यांनी व्यक्त केली. देशातील विविध भाषा टिकायला हव्यात, म्हणून भाषावार प्रांतरचना करण्यात आली. पण आता दुसऱ्या राज्याची भाषा माझ्यावर लादू शकत नाहीत. तिसरी भाषा ही ऐच्छिकच असली पाहिजे. मला हिंदी वगळता दुसरी कोणतीही भारतीय भाषा शिकायची असल्याच मी ती शिकेन. पण हिंदीच का शिकायची?, असा सवाल संदीप देशपांडे यांनी उपस्थित केला.

हिंदी भाषा सक्तीची केल्यास महाराष्ट्र नवनिर्माण पक्ष निश्चितच आंदोलनाची भूमिका घेईल. त्याआधी राज ठाकरे यांच्याशी चर्चा करू, असेही संदीप देशपांडे म्हणाले.

## रणजीत कासले पुण्यात होणार सरेंडर; कराड स्टाईल व्हिडिओ जारी करत दिली अपडेट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७मुंबई**

निलंबित पोलीस अधिकारी रणजीत कासले यांनी काल (दि.१६) व्हिडिओ जारी करत आपण पोलिसांना शरण येणार असल्याचे सांगितले होते. मात्र, यात त्यांनी शरण कधी आणि कोठे येणा याबद्दल काही माहिती दिली नव्हती. त्यानंतर आता कासले यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म फेसबुकवर नवा व्हिडिओ शेअर करत आपण पुण्यात पोलिसांना शरण येणार असल्याचे सांगितले आहे. सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येतील वाल्मिक कराडदेखील पोलिसांना पुण्यातच शरण आला होता. त्याने देखील शरण येण्यापूर्वी व्हिडिओ जारी केला होता. आता त्याच पद्धतीने कासले यांनीदेखील शरण येण्यापूर्वी व्हिडिओ जारी केला आहे. त्यामुळे पुन्हा एकदा पुणे चर्चेच्या केंद्रस्थानी आले आहे.

काही दिवसांपूर्वी संतोष देशमुख हत्याकांडातील मुख्य आरोपी वाल्मीक कराडच्या एन्काऊंटरची ऑफर होती असा दावा निलंबित पोलिस अधिकारी रणजीत कासले यांनी केला होता. त्यांच्या या दाव्यानंतर मोठी खळबळ उडाली होती. त्यानंतर आता



कासले यांनी नवीन व्हिडिओ करत माहिती दिली आहे. ज्यात त्यांनी आपण पुण्यात पोलिसांना शरण येणार असून, जीवाला धोका असल्याने पुणे पोलिसांनी बीडला सोडावं अशी मागणी कासले यांनी केली आहे. तसेच माझ्या घराचं कुलूप फोडून पुरावे नष्ट करण्याचा धनंजय मुंडेंच्या माणसांचा प्रयत्न असल्याचा आरोपही कासले यांनी व्हिडिओमध्ये केला आहे. तर, दुसरीकडे याबाबत पुणे पोलिसांचे आणि बीड पोलिसांचे कासलेबाबत काही बोलणे झाले आहे का? याबाबत काही माहिती समोर आलेली नाही. त्यामुळे जर, कासले पुण्यात शरण आला तर, पुणे पोलिसांची भूमिका काय असणार हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

व्हिडिओ बनवण्याचे कारण म्हणजे खऱ्या अर्थाने आता पुरावे नष्ट करण्यास महाराष्ट्र सरकारनेच सुरूवात केलेली आहे. मी आता थेट महाराष्ट्र सरकारवरचं आरोप करतो असे म्हणत कासले म्हणाले की, बीडमध्ये ज्या ठिकाणी मी राहतो त्या ठिकाणी स्पर्धा परिक्षा देणारे विद्यार्थी राहतात त्यांचा मला व्हॉट्सअपला फोन आला होता. त्यावेळी त्यांनी चार ते पाच माणसं आपल्या घराचं कुलूप तोडून घरात घुसल्याचे सांगितले. एवढेच नव्हे तर, घराला नवीन कुलूप बसवण्यात आले आहे. शिवाय घरावर एक नोटीसही चिटकवण्यात आली असल्याचे कासले यांनी व्हिडिओत सांगितले आहे.

## सुधीर मुनगंटीवार यांच्यासह तीन सत्ताधारी आमदारांना न्यायालयाची नोटीस

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७चंद्रपूर**

विधानसभा निवडणुकीत काँग्रेसप्रणित महाविकास आघाडीच्या पराभूत झालेल्या उमेदवारांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. ईव्हीएमद्वारे निवडणूक घेण्यापूर्वी निवडणूक आयोगाने नोटिफिकेशन काढले नाही, असा आक्षेप घेण्यात आला आहे. त्यानुसार भाजपचे नेते व बल्लारपूरचे आमदार सुधीर मुनगंटीवार, भाजपचे आमदार



देवराव भोंगळे आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे आमदार मनोज कायंदे यांना न्यायालयाने समन्स बजावले आहे.

विधानसभा निवडणुकीत महायुतीच्या विजयी उमेदवारांच्या विजयाला २६ पराभूत उमेदवारांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात आव्हान दिले आहे. यातील तीन प्रकरणावर झालेल्या सुनावणीत न्यायालयाने भाजपचे आमदार, माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार, राष्ट्रवादीचे (अप) आमदार मनोज कायंदे आणि भाजपचे आमदार देवराव भोंगळे यांना समन्स बजावले. यावर तीन आठवड्यांमध्ये उत्तर दाखल करण्याचे आदेश न्यायालयाने या आमदारांना दिले.

बल्लारपूर मतदारसंघाचे काँग्रेसचे उमेदवार संतोषसिंह रावत यांनी सुधीर मुनगंटीवार यांच्या, सिंदखेड राजाचे राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे उमेदवार डॉ. राजेंद्र शिंगणे यांनी मनोज कायंदे यांच्या आणि राजुराचे काँग्रेस उमेदवार सुभाष धोटे यांनी देवराव भोंगळे यांच्या विजयाला आव्हान दिले आहे. या तिघांनी स्वतंत्र याचिका दाखल केल्या आहेत.

## वक्फ कायद्यातील कलमांवरील सर्वोच्च न्यायालयाची स्थगिती : कोणाचा विजय नाही - अजित पवार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७ मुंबई**

केंद्र सरकारने नुकतंच संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान वक्फ सुधारणा विधेयक मंजूर करून घेतलं. त्यावर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या स्वाक्षरीनंतर त्या विधेयकाचं कायद्यात रुपांतर झालं आहे. दरम्यान, काँग्रेससह देशभरातील अनेक पक्ष, संघटना व व्यक्तींनी या कायद्याविरोधात सर्वोच्च न्यायालयाचं दार ठोठावलं आहे. याप्रकरणी आज महत्त्वपूर्ण सुनावणी झाली. या सुनावणीवेळी सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला महत्त्वपूर्ण निर्देश दिले आहेत. वक्फ कायद्यातील दोन कलमांच्या अंमलबजावणीवर सर्वोच्च न्यायालयाने तात्पुरती स्थगिती दिली आहे. न्यायलयाने केंद्र सरकारला स्थगिती दिलेल्या दोन कलमांबाबत येत्या सात दिवसांत भूमिका सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.



## आ. प्रवीण तायडे यांच्या जनसेवा दरबाराला नागरिकांचा भरगच्च प्रतिसाद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७परतवाडा**

अचलपूर मतदार संघाचे आमदार प्रवीण तायडे यांच्या संकल्पनेतून अचलपूर येथील चौधरी मैदानावर जनसेवा दरबाराचे आयोजन करण्यात आले होते , एकाच ठिकाणी सर्व शासकीय विभागांना गोळा करून नागरिकांच्या विविध समस्या जाणून ते मार्गी लावण्याकरिता या उपक्रमाला राबविण्यात आले यावेळी विविध योजना व तक्रारीचे निवारण करण्यासाठी सर्वसामान्य नागरिक , शेतकरी, शेतमजूर , विद्यार्थी , व महिलांनी असंख्य संख्येने उपस्थित राहून या दरबाराचा लाभ घेतला , महसूल विभागातील विविध अडचणी सोडविण्यासाठी शेतकरी व नागरिकांची तुफान गर्दी जनता दरबारामध्ये जमली होती , आमदार प्रवीण तायडे यांनी घेतलेल्या या उपक्रमामुळे नागरिकांना शासकीय विभागातील विविध अधिकाऱ्यांशी चर्चा करून



समस्या सोडवण्याची सोय उपलब्ध झाली या दरबारामध्ये महसूल विभाग, आरोग्य विभाग, मृंद व जलसंधारण विभाग , भूमी अभिलेख कार्यालय , नगरपरिषद कार्यालय , पंचायत विभाग , परिवहन विभाग, समाज कल्याण विभाग, कृषी विभाग , सार्वजनिक बांधकाम विभाग , महावितरण विभाग व पोलीस विभागातील अधिकारी कर्मचारी प्रामुख्याने उपस्थित होते.नागरिकांसाठी चहापाण्याची व्यवस्थाजनता दरबारामध्ये विविध योजना सहित तक्रार निवारणासाठी आलेल्या सर्वसामान्य नागरिक , विद्यार्थी , शेतकरी , महिला व अधिकारी कर्मचाऱ्यांसाठी चहापाणी व नाश्त्याची व्यवस्था करण्यात आली होती वाढत्या तापमानाचा परिणाम कोणत्याही लाभार्थी किंवा अधिकाऱ्यांवर होऊ नये याकरिता पेंडॉलमध्ये कुलरची व्यवस्था करण्यात आली होती रितसर पद्धतीने नागरिकांच्या समस्या जाणून विविध विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ते मार्गी लावण्याकरिता व विविध योजनेचा लाभ मिळवून देण्याकरिता नागरिकांची या जनसेवा दरबाराच्या माध्यमातून साथ दिली.

**आमदारांची शिदोरी पोहोचली रावटीवर**

नागरिकांची समस्या ऐकून ते सोडविण्यामध्ये व्यस्त असलेले आमदार प्रविण तायडे यांच्या दुपारच्या जेवणाची शिदोरी थेट जनता दरबारात पोहोचली दहा मिनिटांचा ब्रेक घेऊन आमदारांनी आपली शिदोरी उघडून उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव व तहसीलदार संजय गरकल यांना सोबत घेऊन जेवण केले दहा मिनिटाच्या ब्रेकनंतर आमदार पुन्हा नागरिकांच्या समस्या सोडविण्यामध्ये व्यस्त झाले.

## संपादकीय ......

# हवामान बदलाची शेतीपुढील आव्हाने

पावसाचे शुभवर्तमान!

महाराष्ट्राच्या काही भागांत अवकाळी पाऊस पडला असला, तरी मुंबईसारख्या महानगराला असह्य उकाडा सहन करावा लागत आहे. विदर्भ, मराठवाडा, सांगली, कोल्हापूर, जळगाव, धुळे अथवा अगदी पुण्यासारख्या शहरांमधूनही उन्हाची दाहकता कमालीची वाढलेली आहे. त्यातच वाढती बांधकामे, रस्त्यांचे काँक्रिटीकरण आणि झाडांची कत्तल यामुळे आपण महाराष्ट्रात आहोत की राजस्थानात, असे वाटण्याइतका उष्मा जाणवत आहे. कित्येक गावांत तीव्र पाणीटंचाई असून, टँकरलॉबीची चंगळ सुरू आहे. मुंबईतही अनेक भागांत पाणी टंचाई असून, त्यातच टँकरचालकांनी संप केला होता. तो मागे घेण्यात आला असला, तरीही लोकसंख्येचा, नागरीकरणाचा वेगाने होणारा विस्तार आणि बेकायदा झोपडपट्ट्यांमुळे पुरवठ्याच्या तुलनेत पाण्याची मागणी वाढतच चालली आहे. येत्या काही दिवसांत परिस्थिती आणखी बिघडण्याचीच शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर यंदा मोसमी पाऊस दमदार पडेल, अशी सुवार्ता हवामान विभागाने दिल्याने मोठा दिलासा मिळाला आहे.

जून ते सप्टेंबर या चारही महिन्यांत मोसमी पावसासाठी प्रादेशिक आणि जागतिक हवामानविषयक स्थिती अनुकूल राहील. देशात सरासरीपेक्षा जास्त, म्हणजे १०५ टक्के पाऊस पडेल, असा दीर्घकालीन अंदाजही वर्तवला आहे. गेल्यावर्षी देशात सरासरीच्या १०८ टक्केपाऊस पडला होता. जून, जुलै व ऑगस्ट या महिन्यांमध्ये २०२४ मध्ये सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडला. त्याअगोदरच्या वर्षात २०२३ मध्ये प्रतिकूल वातावरणामुळे पावसाने ओढ दिली होती. २०२३ मध्ये जून, जुलै व ऑगस्ट या महिन्यांत पाऊस मासिक सरासरीही गाठू शकला नव्हता. यंदा मात्र प्रशांत महासागरात ‘ला निना’ स्थिती संपून, ‘तटस्थ स्थिती’ निर्माण झाली आहे.

‘एल निनो’ स्थिती सप्टेंबरपर्यंत म्हणजे पावसाळा संपेपर्यंत निर्माण होण्याची स्थिती नाही. त्यामुळे पावसाळ्याच्या काळात तटस्थ स्थिती राहून, भारत व भारतीय उपखंडात मोसमी पावसाची अनुकूल परिस्थिती राहण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली. प्रशांत महासागरातील निष्क्रिय स्थिती, हिंदी महासागरातील द्विध्रुवितेची निष्क्रिय स्थिती तसेच आशिया व युरोपात सरासरीपेक्षा कमी हिमवर्षाव हे तीन अनुकूल घटक या अंदाजामागे आहेत. हवामान खाते संपूर्ण जगाच्या हवामानाचा, त्यातील बदलांचा बारकाईने अभ्यास करून, वैज्ञानिक निकष लावून नंतर अंदाज जाहीर करत असते. यावेळी लडाख, ईशान्य भारत आणि तामिळनाडू वगळता देशाच्या अन्य भागांत सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडण्याचा होरा आहे. केवळ महाराष्ट्राचा विचार केला, तरी दक्षिण कोकण किनारपट्टीत, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात चांगल्या पावसाची शक्यता आहे. गेल्यावर्षी अंदाजापेक्षा तीन टक्के जास्त पाऊस पडला. यावेळीही असे घडले, तर शेती आणि पिण्याच्या पाण्याचे संकट दूर होणार आहे.

हवामानाचे हे भाकित संपूर्ण मोसमासाठीचे आणि देशपातळीवरील असून, पुढच्या काही आठवड्यांतील निरीक्षणांनी त्यात अधिक अचूकता येईल, हे लक्षात घेतले पाहिजे. दीर्घकालीन अंदाज हे केवळ एकूण किती पाऊस पडेल आणि कुठे जास्त पावसाची शक्यता आहे, हे सांगतात; पण त्या पावसाचे वितरण कसे असेल आणि पावसाळी दिवसांची संख्या काय असेल, हे स्पष्ट होण्यासाठी आणखी काही दिवस जावे लागतील. यंदा मान्सूनचे आगमन कधी अपेक्षित आहे, हे हवामान विभाग पुढील महिन्याच्या पहिल्या आठवड्यात वर्तवेल, असे सांगण्यात येते, तर मे महिन्याच्या अखेरीस मोसमासाठीचे नेमके भाकित जाहीर केले जाईल.दरवर्षी सामान्यतः १ जूनच्या सुमारास मान्सून केरळमध्ये दाखल होतो आणि सप्टेंबरच्या मध्यापर्यंत तो देशातून माघार घेतो. अर्थात, परतीचा पाऊस हा बर्याचदा मागे-पुढे होत असतो. उन्हाळ्यात भारताच्या मुख्य भूमीचे तापमान वाढून, त्यातून वार्यांची दिशा बदलते आणि मान्सूनची निर्मिती होते. मान्सून येण्याअगोदर यंदा या उष्णतेच्या लाटांची धग जास्त जाणवण्याची शक्यता आहे. खरे तर, एप्रिल आणि जूनमध्ये उष्णतेच्या लाटेच्या दिवसांमध्ये वाढ होईल, असे भाकित हवामान विभागाने अगोदरच

# जूनपासून नवे शैक्षणिक धोरण!

## पहिलीसाठी नवा अभ्यासक्रम



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७अमरावती-** नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० ची (एनईपी) अंमलबजावणी महाराष्ट्राच्या शालेय शिक्षणात यंदापासून होत असून, जूनपासून सुरू होणाऱ्या शैक्षणिक वर्षात पहिलीसाठी नवा अभ्यासक्रम असेल. हे शिक्षण धोरण चार टप्प्यांत विविध वर्गांना लागू होईल आणि मराठी माध्यमांच्या शाळांमध्ये पहिलीपासून हिंदी भाषा अनिवार्य असेल, जूनपासून पहिलीसाठी आणि या शैक्षणिक वर्षापासून चार टप्प्यांत विविध वर्गांना नवे शैक्षणिक धोरण लागू करणारा शासन निर्णय बुधवारी शालेय शिक्षण विभागाने जारी केला.

एनईपीची अंमलबजावणी पदवी अभ्यासक्रमासाठी २०२३-२४ शैक्षणिक वर्षापासून सुरू झाली. यंदा शालेय शिक्षणात सुरू होईल. त्यासाठी एनसीईआरटीच्या धर्तीवर राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने (एससीईआरटी) राज्य अभ्यासक्रम आराखडाही तयार केला. आता प्राथमिक आणि माध्यमिक असे विभाग राहणार नसून त्याऐवजी पायाभूत, पूर्वतयारी, पूर्व माध्यमिक आणि माध्यमिक अशा चार स्तरांमध्ये इयत्तांची विभागणी करण्यात आली आहे.

यंदा पहिलीला नवीन पुस्तके या नव्या धोरणानुसार असतील. २०२६-२७ म्हणजेच पुढल्या शैक्षणिक वर्षात दुसरी, तिसरी, चौथी आणि सहावी या इयत्तांच्या अभ्यासक्रमात बदल होईल. त्यानंतर इयत्ता पाचवी, सातवी, नववी आणि अकरावी या चार वर्षांचा अभ्यासक्रम तिसऱ्या टप्प्यात म्हणजे २०२७-२८ मध्ये बदलणार आहेत. अंतिम टप्प्यात २०२८-२९ मध्ये आठवी, दहावी आणि बारावी या इयत्तांची पुस्तके बदलणार आहेत. हिंदी भाषा तिसऱ्या भाषेप्रमाणे शिकवली जाईल. इतर माध्यमांमध्ये माध्यम भाषा, मराठी आणि इंग्रजी या तीन भाषा अभ्यासक्रमात असतील. इयत्ता सहावी ते दहावी साठी भाषा धोरण हे राज्य अभ्यासक्रम आराखड्यानुसार निश्चित केले जाईल असेही या निर्णयात स्पष्ट केले आहे. शालेय वेळापत्रक, विषययोजना, मूल्यांकन पद्धती आणि परीक्षांचे वेळापत्रक यामध्येही आवश्यक त्या सुधारणा करण्यात येणार आहेत. संपूर्ण शैक्षणिक वर्षाचे नियोजन एससीईआरटी च्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात येणार असून ते शाळांना जूनपूर्वी दिले जाणार आहे.

**असे असणार चार स्तर**

तीन ते आठ वर्षांपर्यंत म्हणजेच इयत्ता दुसरीपर्यंत पायाभूत स्तर असेल. त्यानंतर तिसरी ते पाचवी या इयत्तांचा समावेश पूर्वतयारी स्तरात असेल. सहावी, सातवी आणि आठवी या तीन इयत्ता पूर्व माध्यमिक स्तरात असतील आणि नववी ते बारावीपर्यंत माध्यमिक स्तर गणला जाईल.

९ शिक्षणाची नवीन रचना - ५+३+३+४ आकृतीबंध

स्तर- वयोगट (वर्षे) -इयत्ता

पायाभूत स्तर ३ ते ८ - बालवाटिका १, २, ३ + इयत्ता पहिली व दुसरी

पूर्वतयारी स्तर ८ ते ११ तिसरी, चौथी आणि पाचवी पूर्वमाध्यमिक स्तर ११ ते १४- सहावी, सातवी आणि आठवी

माध्यमिक स्तर - १४ ते १८ नववी, दहावी, अकरावी आणि बारावी

९नवीन अभ्यासक्रम असा टप्प्याटप्प्याने

२०२५-२६: पहिली

२०२६-२७: दुसरी, तिसरी, चौथी, पाचवी, सहावी

२०२७-२८: पाचवी, सातवी, नववी, अकरावी

२०२८-२९: आठवी, दहावी, बारावी

# उन्हाळ्यात पिकांच्या जास्तीच्या उत्पादनासाठी ‘ही’ कामे कराच

**दि.१७विदर्भ प्रजासत्ताक**


उन्हाळी हंगामातील जास्तीच्या तापमानामुळे किंवा पाण्याचा इतरत्र वापर केला गेल्यामुळे पिकांसाठी पाण्याची उपलब्धता कमी होते. अशा परिस्थितीत उन्हाळी पिकांचे विशेष व्यवस्थापन करणे गरजेचे असते.

**आच्छादनाचा वापर करणे :** उन्हाळी हंगामात जास्तीच्या तापमानामुळे जमिनीच्या पृष्ठभागावरून बाष्पीभवन होऊन वाया जाणारे पाणी आच्छादनाचा वापर करून थोपवता येते. त्यासाठी कोणत्याही प्रकारचे आच्छादन हेक्टरी ५ टन या प्रमाणात पीक ३ ते ४ आठवड्यांचे असताना शेतात टाकावे.

**एका आड एक सरी भिजविणे :** पाण्याची उपलब्धता अत्यल्प असल्यास उन्हाळी पिकांची एका आड एक सरी भिजवावी. दुसऱ्या पाण्याच्या वेळी पहिल्यांदा जी सरी भिजवली नसेल ती भिजवावी. असे केल्याने पाण्यात ३० ते ४० टक्के बचत होते तसेच आपले पीकही वाचवता येते.

**पानांची संख्या कमी करणे :** उन्हाळी हंगामातील उष्ण वातावरणामुळे तापमान नियंत्रित करण्यासाठी पानांद्वारे बाष्पनिष्कासन मोठ्या प्रमाणात होते. मात्र बहुतेक ठिकाणी उन्हाळी हंगामात पाण्याचा तुटवडा असल्यामुळे पिकास पाण्याची उपलब्धता कमी असते. अशावेळी पिकाच्या शेंड्याकडील नवीन पाने पिकावर ठेवून खालच्या बाजूची जुनी पाने काढून टाकावीत.

विदर्भ प्रजासत्ताक
कृषी
विशेष





शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळ, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर राठी, मो. ७७२००७७५५०


**केवोलींचा फवारा करणे :** पानांद्वारे होणारे बाष्पनिष्कासन कमी करण्यासाठी केओलीनचे (चुन्याची भुकटी) द्रावण ८ टक्के (१० लिटर पाण्यात ८०० ग्रॅम) या प्रमाणात पिकाच्या पानांवर फवारावे.

**पिकाभोवती आडोसा करणे :** उन्हाळ्यातील उष्ण वाऱ्यामुळे पीक कोमेजून जाते. पर्यायाने उत्पादनात घट येते. हे टाळण्यासाठी पिकाच्या कडेने, वाऱ्याच्या दिशेने शेवरी, धैच्या यासारखी पिके २ ते ३ ओळीत लावल्याने पिकास चांगला आडोसा तयार होतो.

**पिकास सायंकाळी पाणी द्यावे :** वाढत्या उन्हाच्या तापमानामुळे सकाळी किंवा दुपारी पिकास पाणी दिल्यास पाण्याचे मोठ्या प्रमाणात बाष्पीभवन होते. हे टाळण्यासाठी पिकास शक्यतो सायंकाळी पाणी द्यावे.

**पाटाची निगराणी करणे :** चारीतून वाहणाऱ्या पाण्यात तणांमुळे अडथळा निर्माण होतो तसेच चारीत पडलेल्या भेगा व उंदरांच्या बिळामुळे पाण्याचा अपव्यय होतो. ठराविक कालावधीनंतर चारीची स्वच्छता करावी. भेगा व बिळे बुजवावीत.

**- डॉ. कल्याण देवळाणकर,** सेवा निवृत्त शास्त्रज्ञ, कृषी विद्यापीठ




## नेहमी गाडी लागते, उलट्या-मळमळतं? २ सोपे उपाय, प्रवासात गाडी लागणं बंद-आनंदानं जा फिरायला!

**दि. १७ विदर्भ प्रजासत्ताक**

आत्तापर्यंत मुलांच्या परीक्षा संपून सगळ्यांना उन्हाळ्याची सुट्टी पडलीच असेल. बहुतेकवेळा उन्हाळ्याच्या सुट्टीत अनेक घरांमध्ये बाहेर किंवा गावी फिरायला जायचे प्लॅनिंग केले जाते. या प्लॅनिंगनुसार आपण सगळेच वर्षातून एकदा तरी घराबाहेर पडून फिरायला जातो. प्रवासादरम्यान आपल्यापैकी काहीजणांना उलटी, मळमळ होण्याची समस्या सतावते. या समस्येमुळे आपण काहीवेळा घराबाहेर फिरायला जाणे टाळतो.

प्रवासादरम्यान अशी वारंवार उलटी होऊन, डोकं जड होते, मळमळ झाल्यासारखे वाटते, ही समस्या छोटोशी वाटली तरी संपूर्ण प्रवासांत त्रासदायकच ठरते. अशावेळी प्रवासाचा त्रास होऊन अशी उलटी होऊच नये यासाठी अनेक गोळ्या, औषध घेतली जातात. परंतु काहीवेळा ही गोळ्या, औषध घेऊन देखील काहीच उपाय होत नाही. मग अशावेळी ही मळमळ, उलटी आणि डोकेदुखी नेमकी थांबवायची तरी कशी असा प्रश्न पडतो. इतकेच नव्हे तर प्रवासांत असताना आपण लगेच उठून डॉक्टरकडे देखील जाऊ शकत नाही. अशा परिस्थितीत, आपण एक खास उपाय करुन पाहू शकतो. हा खास आयुर्वेदिक उपाय केल्याने प्रवासादरम्यान होणाऱ्या उलटी, मळमळ, डोके व पोटदुखीचा त्रास अगदी मिनिटभरातच थांबून आराम मिळतो. यामुळे आपला पुढील प्रवास अगदी सुखकर होतो.

प्रवासादरम्यान उलटी, मळमळ, डोकेदुखी होऊ नये म्हणून. १. ऍक्युप्रेशर पॉईंट मसाज :- आपल्या उजव्या हाताची पहिली तीन बोट आपल्या डाव्या हाताच्या मनगटापासून खाली तीन बोटांइतके अंतर सोडून जो ऍक्युप्रेशर पॉईंट असतो त्या भागावर हलकेच दाब देत मसाज करावा. तुम्ही २ ते ३ मिनिटे मसाज करु शकता. या उपायामुळे प्रवासादरम्यान उलटी, मळमळ, डोकेदुखीची समस्या कमी होण्यास मदत होईल.

शून्य मुद्रा :- ऍक्युप्रेशर पॉईंट मसाज सोबतच आपण हातांची शून्य मुद्रा देखील करु शकतो. यासाठी आपल्या हातांच्या सगळ्यात मधले बोट दुमडून मग त्यावर अंगठ्याने हलकेच दाब देत याच स्थितीत ५ ते १० मिनिटे डोळे बंद करुन शांत



बसावे. यामुळे उलटी, मळमळ, डोकेदुखीची समस्या कमी होण्यास मदत होईल.

**यासोबतच इतरही गोष्टी लक्षात ठेवा...**

१. प्रवास करताना किंवा त्यापूर्वी तळलेले, भाजलेले आणि मसालेदार पदार्थ खाणे टाळा. जेवल्यानंतर लगेच गाडीतून प्रवास करू नये. जेवण करण्यापूर्वी आणि जेवणानंतर काही काळ थांबावे. हलके अन्न खाल्ल्याने उलट्यांचा धोका कमी होतो.

२. कारमध्ये बसल्यावर एसीऐवजी खिडकी उघडी ठेवून फ्रेश हवा घ्या. तसेच मागे बसण्याऐवजी पुढच्या सीटवर बसले तर बरे होईल.


उन्हाळ्यांत आहारामध्ये करा 'हे' ५ बदल, अपचन - डिहायड्रेशन होणार नाही - उन्हाळा जाईल सुखकर...

३. सकाळी प्रवास करायचा असेल तर रात्री झोपण्यापूर्वी एक ग्लास पाण्यात एक चमचा जिरे, धणे आणि बडीशेप भिजवा आणि सकाळी ते पाणी प्या. यामुळे प्रवासात उलट्या होणार नाहीत.

४. प्रवासात डोकेदुखी आणि उलटीचा त्रास होत असेल तर प्रवासाला निघताना तोंडात एक लहान आल्याचा तुकडा ठेवा, यामुळे तुम्हाला आराम मिळू शकतो. आल्याऐवजी तुम्ही आलेपाक किंवा आल्याची वडीही खाऊ शकता.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तत्कालीन व्यवस्थेवर वाचा फोडली-प्रा.रागिणी देशमुख

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१७अमरावती** स्त्री शिक्षणासाठी महात्मा फुले यांनी पुढाकार घेवून स्त्रियांकरिता शिक्षणाचा मार्ग मोकळा करून दिला तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तत्कालीन व्यवस्थेत येणा-या अडचणींविषयी आपल्या वृत्तपत्राच्या माध्यमातून वाचा फोडली असल्याचे मत विदर्भ युथ वेलफेअर सोसायटीच्या माजी संचालिका तसेच विचारवंत व राज्यशास्त्र अभ्यासक प्रा. रागिणी हेमंत देशमुख यांनी व्यक्त केले.सामाजिक क्रांतीचे जनक अग्रदूत क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि महामानव् डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमाप्रसंगी ‘आजच्या स्त्रीने डॉ. बाबासाहेब



आंबेडकरांकडून काय घ्यावे ?’ या विषयावर प्रमुख वक्त्या म्हणून त्या बोलत होत्या.प्रमुख पाहुणे म्हणून खगोल अभ्यासक विजय गिरूळकर, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयाचे डॉ. रंजित राठोड, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे शहर अध्यक्ष प्रा. डॉ. हेमंत देशमुख आदिंची प्रामुख्याने उपस्थिती होती. यावेळी कार्यक्रमाला श्री. गोपाळराव वर्धे, श्री.पुरुषोत्तम वंजारी, श्री. अशोकराव ढोके, डॉ.ओमप्रकाश कुठेमाटे, अँड.भारत ढोके, सौ.शालिनी पवार , सौ.प्रिया जुमले, सौ शोभा वर्धे, सौ.प्रतिभा ढोके,राजेश इंगळेकर, सुधाकरराव गुलढे, सुधाकर आडे, मरस्कोल्हे, उपस्थित होती.

# कैद्यांसंदर्भातील निर्णय फडणवीस सरकारची संवेदनशील दाखवणारा-हेमंत पाटील

## मानवतेच्या आधारे मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयाचे स्वागत

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७पुणे-** राज्यातील देवेंद्र फडणवीस सरकार मातृशक्ती, शेतकरी, मजूर, पीडित आणि शोषितांबद्दल अत्यंत संवेदनशील असून त्यांच्या हितांना लक्षात घेत धोरणनिर्मितीस प्राधान्य देणारे आहे. यासोबतच राज्यातील कैद्यांबाबत नुकताच मंत्रिमंडळाने घेतलेला निर्णय राज्यकर्त्यांची संवेदनशीलता दाखवून देणारा आहे, असे प्रतिपादन इंडिया अगेन्स्ट करप्शनचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि ओबीसी नेते हेमंत पाटील यांनी व्यक्त केले. कैद्यांच्या कोठडीतील मृत्यूप्रकरणी भरपाईचे धोरण निश्चित केल्याने तसेच मृत्यू प्रकरणांमध्ये दोषी आढळणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाईचा निर्णय घेण्यात आल्याने अनेक ठिकाणी होणाऱ्या गैरप्रकारावर आळा बसेल, असा विश्वास पाटील यांनी व्यक्त केला. व्यवस्थेतील भ्रष्टाचारावर आळा घालण्यासाठी सरकारने टाकलेले पाऊल अत्यंत सकारात्मक आणि महत्वाचे असल्याचे पाटील म्हणाले.

राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाच्या सूचनेनूसार कारागृह कोठडीत असलेल्या कैद्यांचा अनैसर्गिक मृत्यू झाल्यास त्यांच्या वारसांना पाच लाखांची भरपाई देण्याच्या धोरणाला देवेंद्र फडणवीस सरकारने मंजुरी दिली आहे.कारागृहात काम करताना अपघात झाल्यास, वैद्यकीय अधिकाऱ्यांचा निष्काळजीपणा, कारागृह कर्मचाऱ्यांच्या मारहाणीत अथवा कैद्यांच्या आपापसातील भांडणात मृत्यू झाल्यास आणि संबंधित प्रकरणात प्रशासनाचा निष्काळजीपणा चौकशीतून सिद्ध झाल्यास ही भरपाई संबंधित कैद्यांच्या वारसांना दिली जाईल.

मानवतेच्या आधारे हा निर्णय महत्वाचा असून मानवाधिकार आयोगाच्या सूचनेचे सरकारने तंतोतंत पालन केले असल्याचे पाटील म्हणाले.

राज्यातील कारागृहामध्ये टोळीयुद्ध तसेच कैद्यांच्या



गटामधील मारहाणीच्या घटना नव्या नाहीत.

आता सरकारच्या निर्णयामुळे कारागृहातील टोळीयुद्धावर वचक बसवण्याचे मोठे आव्हान कारागृह प्रशासनासमोर उभे झाले आहे. तुरूंग अधिक्षकांसह इतर अधिकाऱ्यांची जबाबदारी पुन्हा वाढली आहे, असे पाटील म्हणाले. राज्यातील सर्व कारागृहांमध्ये हे धोरण लागू राहील. वार्धक्य, दीर्घ आजार, कारागृहातून पलायन करताना अपघातात, जामीनावर असताना किंवा उपचार नाकारल्याने कैद्याचा मृत्यू झाल्यास कुठलीही भरपाई मिळणार नाही. धोरण निश्चित करतांना सरकारने सर्व बाजूने विचार करीत निर्णय घेतला असून योग्य प्रकरणामध्येच याचा फायदा मिळेल,असे पाटील म्हणाले.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucngmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

गुरुवार दि. १७ एप्रिल २०२५

शहर/ग्रामिण




# कर्ज माफिसाठी शेतकऱ्यांसह शिवसेनेची तहसील कार्यालयावर धडक

## कर्जमाफी करा अन्यथा ७/१२ मुख्यमंत्र्यांनकडे गहाण ठेऊ शेतकऱ्यांचा एल्गार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७नांदगाव खंडेश्वर** - आम्ही सत्तेत आल्यास शेतकऱ्यांची संपूर्ण कर्ज माफी करू असे आश्वासन देणाऱ्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आश्वासनाची पूर्तता करून संपूर्ण कर्ज माफी करावी या मागणी साठी ठाकरे गटाच्या शिवसेनेचे प्रकाश मारोटकर यांच्या नेतृत्वात शेतकऱ्यांनी व शिवसैनीकांनी तहसील कार्यालयात धडक देऊन कर्ज माफी करा अन्यथा आमचा ७/१२ मुख्यमंत्र्यानी गहाण ठेवा अशी मागणी केली. सन २०२४ विधानसभा निवडणुकी दरम्यान विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्रात प्रचार सभेमध्ये आमचे सरकार सत्तेत आल्यास शेतकऱ्यांच संपूर्ण कर्ज माफ करू ७/१२ कोरा करू आश्वासनाचे भरवश्यावर भाजप सरकार सत्तेत आले नुकतेच अर्थसंकल्पीय अधिवेशन पार पडले त्यात शेतकऱ्याच्या कर्ज माफिचा निर्णय झाला नाही संपूर्ण महाराष्ट्रात सरकार विरोधात शेतकऱ्यांमध्ये रोष निर्माण झाला आहे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शेतकऱ्यांना कर्ज माफी करता येणार नाही शेतकऱ्यांनी कर्जाचा भरणा करावा असे आदेश दिल्याने सर्वच बँकानी सक्तीची कर्ज वसुली मोहीम सुरु करून शेतकऱ्यांनी कर्जाचा भरणा करावा अश्या नोटीसा सुद्धा बजावल्या आहे त्यामुळे शेतकरी विवंचेत सापडला असून कर्ज माफिच्या आशेवर असेलेला शेतकऱ्यांची निराश्या झाली आहे शेतमालाला कवडी मोल भाव, सततची नापिकी,अवकाळी पाऊस, गारपीट यामुळे शेतकऱ्यांना उत्पन्न झालं नसल्याने कर्ज भरू शकत नाही म्हणुन आश्वासनाची पूर्तता करून शेतकऱ्यांची संपूर्ण कर्ज माफी करावी अन्यथा आम्ही सर्व शेतकरी आमचा ७/१२ मुख्यमंत्र्यानकडे गहाण ठेऊ अश्या मागणीचे निवेदन तहसीलदारांना सादर करून तहसील कार्यालयात फडणवीस मुर्दाबाद शेतकऱ्यांना कर्ज माफी दिलीच पाहिजे आश्वासनाची पूर्तता न करणाऱ्या भाजप सरकारचा निषेध असो अशा घोषणा देत शेतकऱ्यांनी रोष व्यक्त केला यावेळी शिवसेनेचे विधानसभा समन्वयक प्रकाश मारोटकर माजी नगरसेवक निलेश इखार रवी ठाकूर गुणवंत चांदूरकर सुनील गुरमुळे गोपाल बनकर चेतन डकरे रितेश जाधव अंकुश मुळे लोकेश उटबगले आनंद डकरे अशोक पोफळे महादेव दुधे नंदू ढवळे दिलीप ब्राम्हणवाडे विजय पेटले विनोद इखार सुखदेव दुधे भुमेश्वर गोरे सुरेंद्र गावफळे संजय पोफळे सुनील बिटले अजय सोनोने निलेश भेंडरकर शाम सुने अरुण गिरी इत्यादी शेतकरी व शिवसैनिक उपस्थित होते.

### मुख्यमंत्री फडणवीसांनी शेतकऱ्यांची फसवणूक केली :- प्रकाश मारोटकर

आमचं सरकार आल्यावर शेतकऱ्यांची कर्जमाफी करू असे म्हणणारे मुख्यमंत्री फडणवीस यांनी शेतकऱ्यांची फसवणूक केली असून गपगुमान कर्ज भरा अशी तंबी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शेतकऱ्यांना दिली तात्काळ कर्जमाफी करावी अन्यथा शेतकऱ्यांचा ७/१२ फडणवीसांन कडे गहाण ठेवण्याची मोहीम राबून तीव्र आंदोलन छेडु असे प्रकाश मारोटकर यांनी सांगितले.

## विद्यापीठ शिक्षकेत्तर कर्मचारी संघाचे विद्यापीठांमधील प्रलंबित प्रश्न सोडविण्याबाबत मुख्यमंत्र्यांना निवेदन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७अमरावती-** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ शिक्षकेत्तर कर्मचारी संघाच्यावतीने अध्यक्ष श्री अजय देशमुख आणि महासचिव श्री नरेंद्र घाटोळ यांनी राज्याचे मुख्यमंत्री ना. श्री देवेंद्र फडणवीस यांना महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांमधील प्रलंबित प्रश्न सोडविण्याबाबत निवेदन दिले.

राज्यातील शासकीय आस्थापनांवर कार्यरत कर्मचा-यांना सातव्या वेतन आयोगातील १०-२०-३० प्रगती योजना लागू करण्यात आली, मात्र विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांमध्ये अद्याप लागू करण्यात आलेली नाही. तसेच अ-कृषी विद्यापीठांमधील ३५७ शिक्षकेत्तर कर्मचा-यांना अद्यापही सातवा वेतन आयोग



लागू करण्यात आलेला नाही. त्याचबरोबर संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या आस्थापनेवर आकृतीबंधानुसार ४७४ शिक्षकेत्तर कर्मचारी मंजूर आहेत, मात्र सेवानिवृत्तीमुळे ही संख्या २१० पर्यंत खाली आली असून विद्यापीठाच्या कार्यक्षमतेवर विपरित परिणाम होत आहे आणि भविष्यात अधिक गंभीर परिस्थिती उद्भवू शकते.

१५ फेब्रुवारी, २०२३ रोजी झालेल्या बैठकीत विद्यापीठांना महत्वाची रिक्त पदे भरण्याची परवानगी देण्याचे मान्य करण्यात आले व त्यानुसार विद्यापीठाने ७१ पदांचा प्रस्ताव उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडे पाठविला सुध्दा आहे. मात्र त्यावरही अद्याप योग्य ती कार्यवाही झाली नाही. या सर्व बाबींसंदर्भात तातडीने निर्णय घेणे आवश्यक असून संबंधित विभागांना आवश्यक कार्यवाहीकरिता निर्देश द्यावेत अशी मागणी निवेदनाव्दारे करण्यात आली आहे.

## देवेंद्र फडणवीस पुन्हा मुख्यमंत्री झाल्यानंतर प्रथमच पोहचले मामांच्या घरी

### मारोतीचे दर्शन घेवून प्रवेश, पारंपरिक स्वागत, औक्षण



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७अमरावती-** अमरावतीचे माझ्यावर कर्ज आहे... असे उद्गार काढून अंबानगरीसोबतचं नातं सांगणाऱ्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपलं आजोळ... मामा ॲड. चंद्रकांत कलोती यांच्या बालाजी प्लॉट परीसरातील निवासस्थानी अगदी व्यस्ततम दौऱ्यातून वेळातील वेळ काढून भेट दिली.

दुपारी २.०० वा. सुमारास मुख्यमंत्र्यांचा ताफा घरासमोर पोहोचला....! गाडीतून खाली उतरताच मुख्यमंत्र्यांनी प्रवेश केला अन् लहानपणीचं चित्र त्यांच्या डोळ्यासमोर उभे ठाकले... मानाचं सीएम पद मामांच्या घरी पोहचताच ते विसरले... अन् लहानपणीपासून आठवण झाली... मामांच्या अंगणात ८० वर्षे जुने मारोतीरायाचे मंदिर आहे...

या मारोतीरायाचे दर्शन घेवूनच घरातआहे... या मारोतीरायाचे दर्शन घेवूनच घरात प्रवेश करण्याची परंपरा मुख्यमंत्र्यांनी जपली... आणि ते हनुमानजींची पुजा करून नतमस्तक झाले.

त्यानंतर त्यांचे मामी मोहिनी कलोती, आशाताई कलोती, उर्मिला कलोती, मिनाताई कलोती यांनी औक्षण करून स्वागत केले. त्यानंतर मुख्यमंत्री फडणवीस साहेबांनी घरात प्रवेश केला. यावेळी मामेभाऊ ॲड. रोहित कलोती, आल्हाद कलोती, मुकुल कलोती, अमित कलोती, आर्चिस कलोती, सुरुची कलोती, शुभांगी कलोती, सुवर्णा कलोती, इशा कलोती, सुवर्णा कलोती, निलीमा कलोती, मामेबहिण केतकी थोटे यांच्यासोबत जुन्या आठवणी तसेच मनसोक्त गप्पा केल्या. घरातील चिमुकल्यांसोबत सुद्धा मुख्यमंत्र्यांनी गंमत जमंत करून गप्पा करीत त्यांच्यासोबत फोटो सुद्धा काढले. गप्पागोष्टी संपल्यानंतर मामांच्या घरी - मुख्यमंत्र्यांनी आवडती घोळ भाजी, भाकरी, पालेभाज्यांचे जेवण केले.

यावेळी मुख्यमंत्र्यांसमवेत खा.डॉ.अनिल बोंडे, ना.गिरीष यात महाजन, ना. आकाश फुंडकर, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आ. राजेश ये वानखडे, आ. प्रवीण तायडे, आ. रविराणा, माजी आ.प्रविण पोटे, ॲड. प्रशांत नादेशपांडे, शिवराय कुलकर्णी, रविराज देशमुख, राजू मेटे, विवेक चुटके, ललिद संदूरकर, किरण पातुरकर, पोलिस उपायुक्त गणेश शिंदे, मनपा उपायुक्त नरेंद्र वानखडे आदींसह अन्य मान्यवर उपस्थित होते. एक तासाच्या भेटीनंतर मुख्यमंत्री मामांच्या घरून पुढच्या दौऱ्याकडे मार्गस्थ झाले.

## अमरावतीत आमदार नितीन देशमुख यांच्या बेताल वक्तव्याचा पुतळा जाळून जाहीर निषेध

### असे वक्तव्य खपून घेतले जाणार नाही :- गोपाल पाटील अरबट

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७अमरावती**

६अमरावती येथे शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे गटाचा मेळावा नुकताच पार पडला,त्या मेळाव्यात पक्षाचे जिल्हा संपर्क प्रमुख आमदार नितीन देशमुख यांनी शिंदे सरकार भगव्यातील सैतान असल्याचे बेताल वक्तव्य केल्याने शिवसेना शिंदे पक्षाचे जिल्हाप्रमुख गोपाल पाटील अरबट व महानगर प्रमुख संतोष बंद्रे यांच्या नेतृत्वात आज अमरावती येथे आ.नितीन



देशमुख यांच्या पुतळ्याला चपला मारून पुतळा जाळून जाहीर निषेध करण्यात आला व असे बेताल वक्तव्य पुन्हा खपून घेतले जाणार नाही,असा इशारा शिवसेनेच्या वतीने देण्यात आला आहे.यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख गोपाल पाटील अरबट,महानगर प्रमुख संतोष बंद्रे शिवसेना महिला जिल्हाप्रमुख रेखा खारोडे, अरुणा इंगोले,जयश्री कातखेडे, शहर प्रमुख वृंदा मुक्तेवार, सारिका जैस्वाल,युवती सेना जिल्हाप्रमुख कोमल बद्रे, वंदना दार्वेकर,उपजिल्हाप्रमुख सुनिल केने,अजय महल्ले,सुरेश चव्हाण,राजेश पाठक,शैलेश सुर्यवंशी, चेतन कट्यारमल,श्रयश इंगळे आदी शिवसैनिक उपस्थित होते.

## एमएडीसी व्यवस्थापकीय संचालक स्वाती पांडे यांचा साडी-चोळी देऊन सत्कार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७अमरावती**

विमानतळाचे आणि प्रवासी विमानसेवेचे लोकार्पण बुधवारला बेलोरा विमानतळावर राज्याचे मुख्यमंत्री यांच्या हस्ते संपन्न झाले. या भव्य कार्यक्रमात एमएडीसीच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती पांडे यांनी वझरच्या पद्मश्री डॉ.

शंकर बाबा पापळकर यांच्यासह बालगृहाच्या अकरा बेवारस दिव्यांगमुलांना अधिकारी पाठवून कार्यक्रमाला निमंत्रण दिले



होते. हा कार्य सपन्न झाल्यानंतर विमानतळाच्या कार्यालयामध्ये श्रीमती स्वाती पांडे यांचा बालगृहातील सौ. वैशाली अनिल पापडकर (मूकबधिर बेवारस) आणि - इतर मुलांनी साडी चोळी व श्रीफळ देऊन सत्कार केला. अमरावती जिल्ह्याला हवाई मार्गाने जोडल्या बद्दल आभार सुद्धा मानले. सत्कार स्वीकारल्यानंतर माझा माझ्या माहेरी सत्कार झाला याचा मला अत्यंत आनंद होत आहे मी सदैव अमरावती जिल्ह्याची ऋणी राहील असे भावोद्गारयावेळी स्वाती पांडे यांनी काढले. यावेळी त्यांच्या डोळ्यातून आनंदाश्रू वाहत होते. - सौ. वैशाली, कु. सलमा, कु. अर्चना, कु. नयना, कु. अनुसया, सत्यम, अनिल न पापडकर मूकबधिर, मनोज, कल्लूनाथ, अभय इत्यादी मुलांना त्यांनी मिठाई देऊन त्यांचे स्वागत केले.

## अत्याधुनिक साधनांनी पोलिस दल सक्षम करणार- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७अमरावती**

पोलिस दलाला परिणामकारक अंमलबजावणीसाठी जिल्हा वार्षिक योजनेतून वाहने देण्यात येत आहे. येत्या काळातही पोलिसांना अत्याधुनिक साधने देऊन सक्षम करण्यात येणार आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.कोंडेश्वर येथे अमरावती ग्रामीण पोलिस दलाची कोंडेश्वर येथील निवासस्थान इमारत, प्रशासकीय इमारत, चारचाकी नवीन वाहने, तसेच शहर पोलिसांचे चारचाकी नवीन वाहने, वातानुकूलित वाहतूक कक्ष आणि महिला विसावा कक्षाचे लोकार्पण मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या करण्यात आले.यावेळी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार रवी राणा, केवलराम काळे, उमेश उर्फ चंदू यावलकर, प्रताप अडसड, प्रवीण तायडे, प्रवीण पोटे-पाटील, पोलीस महासंचालक (गृहनिर्माण)





अर्चना त्यागी, विभागीय आयुक्त श्वेता सिंघल, विशेष पोलीस महानिरीक्षक रामनाथ पोकळे, जिल्हाधिकारी सौरभ कटियार, पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, पोलीस अधीक्षक विशाल आनंद, मनपा आयुक्त सचिन कलंत्रे आदी उपस्थित होते.मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, पोलिसांच्या आधुनिकीकरणासाठी शासन कटिबद्ध आहे. आधुनिक संसाधनांमुळे नागरिकांच्या सुरक्षितेत भर पडणार आहे. त्यासोबतच पोलीसिंग अधिक गतिमान होईल. आधुनिक साधने पोलिसांनाही सहाय्यभूत ठरणार असल्याने त्यांचे जीवनमान उंचावेल. पोलीस दलात अद्ययावत वाहने दाखल होणे सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. तसेच पोलिस गृहनिर्माण महामंडळाच्या माध्यमातून दर्जेदार घरे बांधण्यात येत आहेत.

पोलीस विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांना हक्काचे घर मिळावे यासाठी डीजी लोन स्कीमही सुरू करण्यात आली आहे.नागरिकांना सुरक्षितता प्रदान करणाऱ्या पोलीसांनाही उत्तम सुविधा पुरविण्यावर भर देण्यात येत आहे. यातील शहर पोलिस दलाचे वातानुकूलित कक्ष, महिला विसावा कक्ष निश्चितच पोलिसांना मदतीचे ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी शहानूर शासकीय निवासस्थान इमारतीच्या कोनशिलेचे अनावरण करण्यात आले. तसेच १८ चारचाकी वाहनांचे लोकार्पण करण्यात आले. पोलिस कर्मचाऱ्यांना कोंडेश्वर येथील निवासस्थानाची चावी सुपूर्द करण्यात आली.

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या बहुउद्देशीय सभागृह, आंतरगृह क्रीडा इमारतीचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते भूमिपूजन



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७अमरावती–** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील बहुउद्देशीय सभागृह व आंतरगृह क्रीडा इमारतीचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे हस्ते आज भूमिपूजन करण्यात आले. या इमारतीमुळे विद्यार्थ्यांना क्रिडा आणि कलागुणांना वाव देण्यासाठी दर्जेदार पायाभूत सुविधाा निर्माण होणार आहे.

यावेळी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, आमदार रवी राणा, प्रताप अडसड, प्रविण तायडे, विभागीय आयुक्त श्वेता सिंघल, जिल्हाधिकारी सौरभ कटियार, विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी कोनशिलेचे अनावरण केले. यावेळी त्यांनी इमारत बांधकामाची माहिती घेतली. उपस्थित मान्यवरांचे डॉ. बाराहाते यांनी पुष्पगुच्छ आणि स्मृतिचिन्ह देऊन स्वागत केले. इमारतीची वैशिष्ट्ये विद्यापीठात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणाऱ्या उपक्रमांतर्गत आधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज बहुउद्देशीय सभागृह व आंतरगृह क्रीडा इमारतीसाठी पीएम उषा योजनेंतर्गत ८ कोटी आणि विद्यापीठ साधारण निधीमधून ५ कोटी असा १३ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध होणार आहे. या इमारतीमध्ये तळमजला आणि पहिला मजला होणार असून २४०१ चौरस मीटर बांधकाम करण्यात येणार आहे. या इमारतीमुळे विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक तंदुरुस्ती, क्रीडाप्रेम आणि संघभावना जोपासण्यासाठी प्रभावी पायाभूत सुविधा निर्माण करण्यात येणार आहे.या संकुलात बॅडमिंटन, टेबल टेनिस, बास्केटबॉल, व्हॉलीबॉल, जिम्नॅस्टिक्स, बुद्धीबळ, योग आणि मार्शल आर्ट या इनडोअर क्रीडा प्रकारांचा समावेश राहणार आहे. खेळाडूच्या गरजांचा विचार करून ही इमारत आधुनिक डिझाईननुसार उभारली जाणार आहे. इमारतीमध्ये दर्जेदार फ्लोअरिंग, योग्य प्रकाशयोजना, वायुवीजन, बदलण्याची खोली, प्रेक्षक आसन व्यवस्था, तसेच दिव्यांगांसाठी सुलभ प्रवेश सुविधा उपलब्ध राहतील. बहुउद्देशीय सभागृह खेळासह दीक्षांत समारंभ, सांस्कृतिक कार्यक्रम, कार्यशाळा, परिसंवाद, विद्यापीठस्तरीय समारंभ, तसेच सामुदायिक उपक्रमासाठी उपयोगात येणार आहे.हा उपक्रम राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या जीवनकौशल्य आणि शारीरिक शिक्षणविषयक उद्दिष्टांशी सुसंगत आहे. विद्यापीठाच्या 'आरोग्यदायी आणि सक्रिय परिसर' निर्मितीच्या बांधिलकीचा एक भाग आहे. हे संकुल विद्यार्थ्यांना प्रशिक्षण आणि स्पर्धेच्या संधी उपलब्ध करुन नवोदित क्रीडा प्रतिभा ओळखून त्या घडवण्याचे कार्य करेल. नवीन इमारत आणि सभागृह विद्यापीठाच्या प्रगतीच्या वाटचालीत एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

# जिल्हा परिषदेत बहुतांश विभागात अजूनही 'बायोमेट्रिक' नाही

## कधीही या, रजिस्टरवर तुम्हीच वेळ लिहा



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७अमरावती–** शहरातील अनेक बायोमेट्रिक हजेरी नसलेल्या शासकीय कार्यालयामध्ये कर्मचाऱ्यांना रजिस्टरवच हजेरी नोंदवावी लागत आहे. यामुळे कर्मचारी कार्यालयात किती वाजता हजर झाले आणि किती वाजता गेले याबाबतचा लेखाजोखा ऑनलाइन दिसत नाही. यामुळे या शासकीय कर्मचाऱ्यांचे चांगले होत असल्याचे चित्र बायोमेट्रिक हजेरी नसलेल्या विविध शासकीय कार्यालयांत दिसून येत आहे.

जिल्हा व तालुका मुख्यालयी असलेल्या जिल्हा परिषदेच्या अखत्यारित येणाऱ्या मुख्य लेखा व वित्त विभाग, समाजकल्याण विभाग, याशिवाय बांधकाम व पाणीपुरवठा विभागाचे उपविभाग, आरोग्य विभाग, शिक्षण विभाग माध्यमिक, तसेच पंचायत समिती अमरावती, पंचायत समिती भातकुली याशिवाय जिल्हा उद्योग केंद्र अशा अनेक शासकीय कार्यालयांत कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या हजेरी-गैरहजेरी नोंदविण्यासाठी बायोमेट्रिक यंत्रणा कार्यान्वित केलेली नाही. त्यामुळे या सर्व विभागांतील कार्यरत कर्मचारी नेमके किती वाजता कर्तव्यावर हजर होतात आणि केव्हा जातात याचा ऑनलाइन डेटा ठेवला जात नाही. परिणामी सदर विभागातील कर्मचारी हे आजही रजिस्टवरच आपल्या कर्तव्यावरील कामाची हजेरी नोंदवीत आहेत.

वेळेवर येणारे कमीच

विविध सरकारी कार्यालयांत सकाळी निवांत येणाऱ्यांची संख्या मोठी आहे. अनेक जण फिरतीची कारणे सांगून गायब असतात. भटकंती करणाऱ्यांची संख्या वाढत आहे. या पार्श्वभूमीवर बायोमेट्रिक यंत्रणा बसविणे आवश्यक आहे.

येथे रजिष्टरवरच हजेरी...

जिल्हा परिषदेत बहुतांश विभागांत हजेरीसाठी बायोमेट्रिक प्रणालीचा अवलंब होत असला तरी वित्त विभाग, आरोग्य विभाग, माध्यमिक शिक्षण विभाग, बांधकाम, पाणीपुरवठा विभागाचे उपविभागात रजिस्टवरच हजेरी नोंदविली जाते.

जिल्हाभरातील आरोग्य केंद्रांमध्येही बायोमेट्रिक हजेरी प्रणाली बसविलेली नाही. आता ती बसविण्याची गरज निर्माण झाली आहे.

जिल्हा उद्योग केंद्रात कार्यरत ३ असलेल्या कर्मचाऱ्यांची हजेरी सध्याही रजिस्टरमध्ये नोंदविली जात आहे. या विभागात अद्यापपर्यंत तरी बायोमेट्रिक यंत्रणा सुरू केलेली नाही.

# शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार जाहीर, शकुंतला खटावकर यांना जीवनगौरव!

## ८९ पुरस्कार विजेत्यांचा राज्याच्या क्रिडा विभागाकडून केला जाणार सन्मान

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७मुंबई –** राज्याच्या क्रीडा विभागाकडून बुधवारी शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारांची घोषणा करण्यात आली. माजी राष्ट्रीय महिला कबड्डीपटू संघटक शकुंतला खटावकर यांना २०२३-२४ या वर्षाचा शिवछत्रपती राज्य क्रीडा जीवनगौरव पुरस्कार जाहीर झाला. यासह एकूण ८९ खेळाडूंना हा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे, ज्यात भारताचे क्रिकेटपटू शिवम दुबे, ऋतुराज गायकवाड आणि यशस्वी जैस्वाल यांच्याही नावाचा समावेश आहे. येत्या १८ एप्रिल रोजी राज्याच्या क्रीडा विभागाकडून पुरस्कार विजेत्यांचा सन्मान केला जाणार आहे.

मुंबईत बुधवारी शिवछत्रपती राज्य क्रीडा जीवनगौरव पुरस्कारासह, उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शन- जिजामाता पुरस्कार, खेळाडूंसाठीचा शिवछत्रपती राज्य क्रिडा पुरस्कार, शिवछत्रपती राज्य क्रीडा साहसी पुरस्कार, दिव्यांग खेळाडूंचा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार अशा एकूण ८९ पुरस्काराची घोषणा करण्यात आली.

२०२३-२४ पुरस्कार्थींची यादी:

शिवछत्रपती राज्य क्रीडा जीवनगौरव पुरस्कार - शकुंतला खटावकर (पुणे).

उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक : जिम्नॅस्टिक्स - प्रवीण ढगे (पुणे). कुस्ती - गोविंद पवार (पुणे), शिवशंकर भावले (लातूर). खो-खो - प्रवीण बागल (धाराशिव). दिव्यांग मार्गदर्शक - मानसिंग पाटील (कोल्हापूर, पॅरा जलतरण). थेट पुरस्कार - गणेश देवरुखकर (मुंबई उपनगर). जिजामाता पुरस्कार - रचना धोपेश्वर (पुणे, पॅरा ज्युदो).

**खेळाडू (थेट पुरस्कार):**

तिरंदाजी- अदिती स्वामी (सातारा), ओजस देवतळे (नागपूर), प्रथमेश जवकार (बुलढाणा),

थलेटिक्स- ऐश्वर्या मिश्रा (मुंबई उपनगर), यमुना आत्माराम (पुणे), किरण भोसले (कोल्हापूर).

बॅडमिंटन- चिराग शेट्टी (मुंबई उपनगर), अक्षया वारंग (मुंबई शहर).

क्रिकेट- जेमिमा रॉड्रिग्ज (मुंबई शहर), देविका वैद्य (पुणे), राहुल त्रिपाठी (पुणे), ऋतुराज गायकवाड (पुणे), शिवम दुबे (मुंबई उपनगर), जितेश शर्मा (अमरावती), यशस्वी जयस्वाल (मुंबई शहर).

अश्वारोहण- हृदय छेडा (मुंबई उपनगर).



हॉकी- वैष्णवी फाळके (सातारा).

कबड्डी- अस्लम इनामदार (अहिल्यानगर), आकाश शिंदे (नाशिक).

रोइंग- धनंजय पांडे (रायगड).

नेमबाजी- किरण जाधव (सातारा).

जलतरण वॉटरपोलो- सांजली वानखेडे (अमरावती), उदय उत्तेकर (ठाणे).

तिरंदाजी- मंजिरी अलोणे (अमरावती), यशदीप भोगे (अमरावती).

बॉक्सिंग- अजय पेंडोर (नांदेड).

तलवारबाजी- श्रुती जोशी (नागपूर), धनंजय जाधव (सांगली).

कॅनोइंग व कयाकिंग- अंकुश पोवटे (सांगली).

सायकलिंग- ऋतिका गायकवाड (नाशिक), मयूर पवार (सातारा).

जिम्नॅस्टिक्स (आर्टिस्टिक्स)- ईशिता रेवाळे (मुंबई उपनगर).

रिदमिक जिम्नॅस्टिक्स- संयुक्ता काळे (ठाणे).

जिम्नॅस्टिक्स ट्रॅम्पोलिन- राही पाखले (ठाणे), आदर्श भोईर (ठाणे).

ज्युदो- श्रद्धा चोपडे (छत्रपती संभाजीनगर).

# .तर अमरावती-मुंबई विमानसेवा बंद होईल खुद्द उपमुख्यमंत्र्यांनि व्यक्त केली शंका

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि. १७अमरावती : –** अलायन्स एअर कंपनीच्या मुंबई-अमरावती-मुंबई या विमानसेवेचा शुभारंभ बुधवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाला. सकाळी ११ वाजून २० मिनिटांनी अलायन्स एअरचे ७२ आसनी विमान धावपट्टीवर उतरले. विमान उतरताच अग्निशमन दलाने पाण्याचे उंच फवारे मारून पहिल्या विमानाचे जोरदार स्वागत केले. त्यानंतर प्रवाशांना घेऊन विमान मुंबईच्या दिशेने झेपावले. पण, यावेळी लोकार्पण कार्यक्रमात बोलताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी एक शंका व्यक्त केली, त्याची चर्चा आता रंगली आहे.



अजित पवार म्हणाले, अलायन्स एअरने राज्यातील इतर विमानतळांवरून देखील प्रवासी विमानसेवा सुरू करायला हवी. अमरावती ते मुंबई ही सेवा आजपासून सुरू झाली, त्याचा आपल्याला आनंद आहे, पण ही सेवा अखंडपणे दिली जावी, अशी आपली सूचना आहे. कुठल्या कारणाने विमान फेरी रद्द झाली, तर प्रवाशांसाठी कंपनीने पर्यायी व्यवस्था करायला हवी. प्रवाशांना त्यांच्या तिकिटाची रक्कम देखील परत मिळायला हवी. विशेष म्हणजे मुंबई-अमरावती-मुंबई या प्रवासी विमानसेवेच्या वेळा प्रवाशांसाठी सोयीच्या नाहीत. त्यामुळे विमानसेवाच बंद पडण्याचा धोका आहे. केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्र्यांनी या बाबतीत लक्ष द्यावे, असे अजित पवार यांनी सांगितले. येत्या १८ एप्रिलपासून मुंबईहून दुपारी २.३० वाजता अमरावतीसाठी विमान निघणार असून दुपारी ४.१५ वाजता अमरावती विमानतळावर पोहचेल. अमरावतीहून मुंबईसाठी दुपारी ४.४० वाजता उड्डाण घेणार असून मुंबईला सायंकाळी ६.२५ वाजता पोहचेल. या वेळा अमरावतीकर प्रवाशांसाठी सोयीच्या नाहीत, अशा तक्रारी करण्यात आल्या होत्या.

# बावनकुळेंची उध्दव ठाकरेंवर टीका, म्हणाले आज बाळासाहेब ठाकरे असते तर लाथच मारली असती''



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७नागपूर :** दिवंगत बाळासाहेब ठाकरे आपल्या शिवसैनिकांसोबत पुन्हा एकदा संवाद साधणार आहेत. थोडं आश्चर्य वाटेल पण हे खरं आहे. आधुनिक युगातील एआय तंत्रज्ञानाचा वापर करुन ठाकरेंची शिवसेना आपल्या नाशिकच्या मेळाव्यात हा प्रयोग केला . तेव्हा पुन्हा एकदा महाराष्ट्रातील जनतेला ठाकरे शैलीतील भाषण बाळासाहेब ठाकरे यांच्या एआय निर्मित आवाजात ऐकण्याची उत्सुकता शिवसैनिकांना होती. महाराष्ट्राच्या राजकारणाचा झालेला चिखल आणि सध्याच्या राजकीय परिस्थितीवर बाळासाहेब भाष्य करणार याकडे लक्ष होते.. यावर भाजपचे प्रदेशा अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रखर टीका केली आहे.

बावनकुळे म्हणाले, आपला आवाज कुणी ऐकत नाही, म्हणून आपले विचार हिंदूहृदयसम्राट वंदनीय शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आवाजात ऐकवण्याचा पोरकटपणा फक्त आणि फक्त उबाठासारखा गटच करू शकतो. मला खात्री आहे, आज ज्यांनी बाळासाहेबांना जनाब ठरविले,ज्यांनी टिपू सुलतानाचे नावं उद्यानांना दिली.ज्या गोष्टींसाठी बाळासाहेबांनी संपूर्ण आयुष्य खर्ची घातले, किमान त्याच्या विरोधात बाळासाहेबांचा आवाज वापरु नये. त्यांचे विचार बुडविलात. किमान मृत्यूनंतर त्यांच्या आवाजाचा असा गैरवापर करू नका. आज बाळासाहेब असते तर लाथच मारली असती अशा शब्दात भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचा घणाघात केला आहे. बाळासाहेबांचा आवाज वापरून त्यांच्या विचारांचा द्रोह करण्याचा हा प्रकार आहे. बाळासाहेबांचे संपूर्ण आयुष्य ज्याच्या विरोधात गेले, त्याच विचारांच्या बाजूने उबाठा गट आहे, असे चंद्रशेखर बावनकुळे यांनी एक्सवरून म्हणाले.

# आरोपींच्या घरांवर बुलडोझर कारवाई; नागपूर महानगरपालिकेने मागितली बिनशर्त माफी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७नागपूर :–** मध्य नागपूर हिंसाचाराचा कथित सूत्रधार फहीम खान शमीम खान याच्यासह इतर आरोपींच्या अनधिकृत घरांवर बुलडोझर कारवाई करताना सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचे उल्लंघन झाल्यामुळे महानगरपालिका आयुक्त डॉ. अभिजित चौधरी यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठामध्ये बिनशर्त माफी मागितली. तसेच, भविष्यात सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचे काटेकोरपणे पालन केले जाईल, अशी ग्वाही दिली.सर्वोच्च न्यायालयाने १३ नोव्हेंबर २०२४ रोजी दिलेल्या निर्देशांनुसार अनधिकृत बांधकाम हटविण्यापूर्वी घरमालकाला नोटीस जारी करणे व नोटीसवर उत्तर देण्यास १५ दिवसांचा वेळ देणे बंधनकारक आहे.

परंतु, या प्रकरणात बुलडोझर कारवाई करताना निर्देशांचे पालन केले गेले नाही. त्यामुळे फहीम खानच्या आईसह इतरांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केल्या आहेत.गेल्या २४ मार्च रोजी या प्रकरणावरील सुनावणीनंतर उच्च न्यायालयाला बुलडोझर कारवाई प्रथमदृष्ट्या अवैध आढळून आली. त्यामुळे न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त करून बुलडोझर कारवाईला अंतरिम स्थगिती देऊन मनपाला स्पष्टीकरण मागितले होते. त्यानुसार, चौधरी यांनी उच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल करून सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचे उल्लंघन झाल्याचे कबूल करीत माफी मागितली.

### बुलडोझर कारवाई कायद्यानुसारच

राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांबाबत अद्याप परिपत्रक जारी केले नाही. त्यामुळे मनपाच्या अधिकाऱ्यांना या निर्देशांची माहितीच नव्हती. त्यांनी या निर्देशांचे जाणीवपूर्वक उल्लंघन केले नाही. याशिवाय, कारवाई करण्यामागे कोणताही वाईट हेतू नव्हता. कारवाई करताना संबंधित कायद्याचे काटेकोर पालन करण्यात आले, असेही मनपा आयुक्तांनी सांगितले.

# तुम्ही मुख्यमंत्री असताना झोपला होतात का? 'त्या' मागणीवरून गिरीश महाजनांचा उद्धव ठाकरेंना टोला

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७मुंबई–** शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांनी बुधवारी नाशिकमधील पक्ष्याच्या निर्धार शिबिरात उपस्थित कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यासोबत संवाद साधला. यावेळी त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांच्यावरही थेट हल्ला चढवला. आपल्याला छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल खरोखरच आदर असेल, तर शिवजयंतीला देशभर सुट्टी जाहीर करा, असे आव्हान उद्धव ठाकरे यांनी अमित शाह यांना दिले. यावर, एवढे दिवस झोपला होतात का? आपण मुख्यमंत्री होतात, तेव्हा मागणी केली आपण? मुख्यमंत्री असताना आपण काय केलं तेथे? असा सवाल भाजप नेते गिरीश महाजन यांनी केला आहे.

शिवजयंतीनिमित्त देशभरात सुट्टी जाहीर करण्यासंदर्भात बोलताना, उद्धव ठाकरे म्हणाले होते, शाहजी (अमित शाह), छत्रपती शिवाजी महाराजांना तुम्ही सांगून कुणी महाराष्ट्रापुरते सिमित ठेवेले, नाही नाही. शिवाजी महाराज जगाच्या काना-कोपऱ्यात पोहोचले आहेत. पण तुम्हाला त्यांच्याबद्दल



खरोखरच आदर असेल, तर शिवजयंतीला देशभर सुट्टी जाहीर करा. इकडे येऊन केवळ मतांसाठी 'छत्रपती शिवाजी महाराज की जय' बोलू नका. उद्धव ठाकरे यांच्या या विधानानंतर, गिरीश महाजन यांनीही पलटवार केला आहे. महाजन म्हणाले. एवढे दिवस झोपले होते का? आपण मुख्यमंत्री होतात, तेव्हा मागणी केली आपण? मुख्यमंत्री असताना आपण काय केलं तेथे? ते ठरवतीलना, पंतप्रधान ठरवतील. शिवाजी महाराज तर आमच्या साठी आदर्श आहेतच. तो काही प्रश्नच नाही. महाराष्ट्राला सुट्टी आहे. देशाचाही ते निर्णय घेतील. पण आपण मुख्यमंत्री असताना कधी गेलात का तेथे? कधी आपण बोललात का? कधी हा विषय काढला का? विनाकारण काही तरी, आता कामं शिल्लक राहिलेली नाहीत, म्हणून काही बोलायचे.असे महाजन म्हणालेत.

# आता रास्त भाव दुकानदारांना मिळणार १.९० पैसे प्रति किलो कमिशन वाढ

## आ.सौ. सुलभाताई खोडके यांचा शासनाकडे यशस्वी पाठपुरावा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

सरकारी स्वस्त धान्य दुकानदारांना वर्ष २०१७ पासून कमिशन वाढ मिळाली नव्हती. सरकारी स्वस्त धान्य दुकानदारांना महागाई निर्देशानुसार दरमहा कमिशन वाढ मिळावी, यासाठी अमरावतीच्या आमदार –सौ. सुलभाताई खोडके यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांच्याकडे पाठपुरावा केल्याने आता प्रति किलो मागे ४० पैसे कमिशन वाढ लागू करण्यात आली आहे. त्यामुळे आता सरकारी स्वस्त धान्य दुकानदारांना प्रतिकिलो मागे दरमहा १ रुपया ९० पैसे कमिशन मिळणार असल्याने राज्यातील ५६ हजार रास्त भाव दुकानदारांना मोठा दिलासा मिळाला आहे. या बद्दल आ.सौ. सुलभाताई खोडके यांनी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री ना. अजितदादा पवार यांचे आभार मानून अभिनंदन केले आहे.

सरकारी स्वस्त धान्य दुकानदारांकडून अंत्योदय , प्राधान्य कुटुंबाचे लाभार्थी ,केशरी व शेतकरी कुटुंब अशा शिधापत्रिकाधारकांना स्वस्त धान्याचे वाटप केले जाते. मात्र पुरवठा व वितरण प्रणाली मध्ये महत्वाचे काम करणाऱ्या स्वस्त धान्य दुकानदारांच्या अनेक मागण्या प्रलंबित आहेत. सरकारी स्वस्त धान्य दुकानदारांना आजच्या महागाई निर्देशानुसार दरमहा कमिशन वाढ मिळण्याच्या मागणीला घेऊन अमरावती रास्त भाव दुकानदार संघाच्या वतीने आ.सौ. सुलभाताई संजय खोडके यांना निवेदन देण्यात आले होते. या संदर्भात आ.सौ. सुलभाताई खोडके व आ. संजय खोडके यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री ना. अजितदादा पवार यांच्याकडे पाठपुरावा केला.राज्यात २०१७ नंतर सरकारी रास्त भाव दुकानदारांचा मोबदला वाढवला नाही. वाढती महागाई आणि वाढता खर्च याचा विचार करता या दुकानदारांचा मोबदला वाढवून देणे अपेक्षित आहे.यापूर्वी केंद्र शासनाने २० पैसे प्रतिकिलोची कमिशन वाढ केलेली आहे. ती सुद्धा रास्तभाव दुकानदारांना मिळत नाही. या बाबत आ. सौ. सुलभाताई संजय खोडके यांनी उपमुख्यमंत्री महोदयांना अवगत केले. अशातच आता राज्यशासनाच्या वतीने रास्तभाव दुकानदारांच्या कमिशनमध्ये प्रतिकिलो २० पैसे वाढ केली असल्याने आता केंद्र शासनाने २० पैसे व राज्य सरकारने २० पैसे असे एकूण ४० पैसे कमिशन वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे आता रास्तभाव दुकानदारांना दरमहा १ रुपया ९० पैसे प्रति किलो ची कमिशन वाढ झाली आहे. सद्या त्यांना १.५० पैसे कमिशन मिळत असून आता ४० पैसे वाढ झाल्याने दरमहा प्रतिकिलो १ रुपया ९० पैसे कमिशन वाढ मिळणार आहे. यातून राज्यातील ५६ हजार सरकारी रास्त भाव दुकानदारांना मोठा दिलासा मिळाला आहे. या बद्दल आ.सौ. सुलभाताई खोडके यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री ना. अजितदादा पवार यांचे आभार मानून अभिनंदन केले आहे.

# संचमान्यता शासन निर्णयाविरोधात उच्च न्यायालयात शिक्षकांची याचिका

## १५ मार्च २०२४ चा शासन निर्णय रद्द करा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

शासनाच्या १५ मार्च २०२४ च्या अन्यायकारक संचमान्यतेविरोधात राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्या माध्यमातून जिल्ह्यातील शिक्षकांनी याचिका दाखल करून उच्च न्यायालयाचे दरवाजे ठोठावले आहेत. या निर्णयाविरोधात शशांक आटक यांच्यासह १९३ शिक्षक न्यायालयात गेले आहेत.१५ मार्च २०२४ रोजी नवीन शिक्षकांची संचमान्यता शासननिर्णय निर्गमित करून संचमान्यतेच्या निकषात बदल केला आहे. पटसंख्येवर आधारित या निर्णयाचा मोठा फटका कोकणातील ५ जिल्ह्यांना बसला असून पदवीधर शिक्षकांची सुमारे ५० टक्के पदे अतिरिक्त ठरणार आहेत. या निर्णयाविरोधात शिक्षक संघटनांनी जुलै २०२४ मध्ये शिक्षकांचे मोर्चे काढले. मार्च २०२५ मध्ये जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र आंदोलने केली परंतु, शासनाने अन्यायकारक शासननिर्णय बदललेला नाही. त्यामुळे जिल्ह्यातील १९३ पदवीधर शिक्षकांनी मुंबई उच्च न्यायालय खंडपीठासमोर याचिका दाखल केली आहे.हा निर्णय शिक्षक आस्थापनेवर प्रतिकुल परिणाम करणारा आहे. जिल्ह्यात या ४ आदेशाने ८०० पदवीधर शिक्षक, १६० उपशिक्षक व ६ मुख्याध्यापक अतिरिक्त ठरण्याचा धोका आहे. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवरही प्रतिकूल परिणाम होणार आहे. प्रत्येक वर्गाला आठवड्यातून ४८ तासिका अध्यापन करायचे असताना १ ते ४/५ च्या शाळेत चार ते पाच वर्ग व दोन शिक्षक तर १ ते ८ च्या शाळेत ६ ते ७ वर्ग व दोन शिक्षक अशी स्थिती होणार आहे. मग, गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे तीन–तेरा वाजणारच आहेत. पहिलीपासून प्रत्येक वर्गाला किमान ६ ते ९ विषय आहेत. एक शिक्षक व दोन ते तीन वर्ग अध्यापन करणे शक्य नाही. सातवीला ९ विषय आहेत. प्रत्येक इयत्तेची पुस्तके वेगवेगळी आहेत. ऑनलाईन कामाची भरमसाठ यादीच मुख्याध्यापकांच्या सोबतीला आहे. यामुळे याचिका केल्याची माहिती ज्येष्ठ मार्गदर्शक चंद्रकांत अणावकर यांनी दिली. अमरावती जिल्हात या १५मार्च२०२४च्या संच मान्यतेच्या शासन निर्णयामुळे अंदाजे १हजार शिक्षक अतिरीक्त होऊ शकतात.म्हणुन हा शासन निर्णय रद्द करण्यात यावा अश्या करीता प्राथमिक शिक्षक समितीने उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपिठात धाव घेतली आहे.हा शासन निर्णय रद्द करावा म्हणुन विविध स्तरावर आंदोलने केली तसेच निवेदन,शिक्षण मंत्र्याना विद्यार्थांचे पत्र,शाळा व्यवस्थापन समितीचे ठराव,ग्राम पंचायतचे ठराव आणि लोक प्रतिनिधी यांना निवेदने देण्यात आली होती पण शासनाने हा शासन निर्णय मागे न घेतल्यामुळे अखेर शिक्षकांना न्यायालयाचे दार ठोठवावे लागले असे शिक्षक समितीचे राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी कळविले आहे.

# १००% ग्रामपंचायत कर भरणा करणाऱ्या करदात्यांकरीता दिवानखेड ग्रामपंचायतीने राबविली प्रोत्साहन बक्षीस योजना



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७तिवसा**

१००% ग्रामपंचायत कर भरणा करणाऱ्या करदात्यांकरीता ग्रामपंचायत दिवानखेड ता. तिवसा येथे प्रोत्साहन बक्षीस योजनेचा कार्यक्रम पार पडला. सर्व प्रथम राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, कर्मयोगी गाडगे महाराज, छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पण करण्यात आले. त्यानंतर ग्रामपंचायत थकीत आणि नियमित कर भरणाऱ्यांकरीत लकी ड्रॉ च्या स्वरूपात नावीन्यपूर्ण बक्षीस योजना राबविण्यात आली. या मध्ये ७ बक्षीसे व प्रत्तेक १००% ग्रामपंचायत कर भरणा करणाऱ्या करदात्याला कचरा कुंडीचे वाटप प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. जबरदस्ती अथवा जप्तीच्या मार्गाने थकीत कर वसूली करण्याएवजी एका वेगळ्या फंड्याचा उपयोग करून करवसुलीचे उद्दिष्ट पूर्ण करण्याचा ग्रामपंचयातीचा हा एक प्रयत्न होता. तसेच करदात्यांचा चांगला प्रतिसाद असल्यास दरवर्षी काहीतरी नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्याचा ग्रामपंचयातीचा दृष्टीकोण असल्याचे या ठिकाणी सांगण्यात आले. त्यानंतर कार्यक्रमाला उपस्थित अभिषेक कासोदे गटविकास अधिकारी पं. स. तिवसा व पांडुरंगजी उलेमाले साहेब विस्तार अधिकारी (पंचायत) पं. स. तिवसा आदींनी मार्गदर्शन केले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष बाळूभाऊ ऊड़के सरपंच दिवानखेड, प्रवीणभाऊ खताळे उपसरपंच दिवानखेड, ग्रामपंचायत सदस्य व ग्रामपंचायत अधिकारी आमले कार्यक्रमास उपस्थित होते. त्याच प्रमाणे कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता ग्रामपंचायत कर्मचारीवृंद, ग्रामरोजगार सेवक यांनी परिश्रम केले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन नंदुभाऊ हुंडीवाले यांनी केले.

# धामणगाव रेल्वे तालुका मुख्याध्यापक संघातर्फे तालुक्यातील माजी मुख्याध्यापकांचा सन्मान



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७धामणगाव रेल्वे**

धामणगाव एज्युकेशन सोसायटी द्वारा संचालित सेठ फत्तेलाल लाभचंद हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात तालुका मुख्याध्यापक संघ यांच्याद्वारे सेवानिवृत्त मुख्याध्यापकांचा सत्कार करण्यात आला.

या सत्कार समारंभाचे अध्यक्ष– धामणगाव एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष ॲड. रमेशचंद्र चांडक तसेच कार्यक्रमाचे सत्कारमूर्ती व प्रमुख अतिथी धामणगाव रेल्वे विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रताप अडसड हे होते.तर प्रमुख अतिथी म्हणून अमरावती जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष प्रवीण दिवे, अमरावती जिल्हा मुख्याध्यापक संघाचे सहसचिव गजानन मानकर, पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी सपना भोगावकर, धामणगाव तालुका मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष मिलिंद देशमुख, से.फ.ला. हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य प्रशांत शेंडे हे सर्व मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी व सत्कारमूर्ती आमदार प्रताप अडसड यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

तसेच या कार्यक्रमाचे सेवानिवृत्त सत्कारमूर्ती से.फ.ला. हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचे माजी प्राचार्य गणेश चांडक, कान्होजीबाबा विद्यालय, अंजनसिंगीचे माजी प्राचार्य भाऊराव गाढवे, साईबाबा विद्यालय, अंजनसिंगीचे माजी मुख्याध्यापक प्रकाश दातार सोबतच से.फ.ला. हायस्कूलचे कलाशिक्षक अजय जिरापुरे हे सुद्धा व्यासपीठावर उपस्थित होते.उपस्थित सर्व मान्यवरांच्या हस्ते माजी मुख्याध्यापकांचा शाल,श्रीफळ, स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र देऊन सत्कार सोहळा पार पडला.. या कार्यक्रमांमध्ये कलाशिक्षक अजय जिरापुरे यांचा कला शिक्षक म्हणून उत्कृष्ट कार्य करीत असल्याबद्दल सोबतच विद्यार्थ्यांवर नेहमीच चित्र संस्कार, विदयार्थ्यांना कला स्पर्धेसाठी उत्कृष्ट मार्गदर्शन व प्रोत्साहन व अजय जिरापुरे यांच्या प्रेरणादायी शिकवणीमुळे विदयार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विदयालयात विकास होत आहे. त्यांना कलेचा एक नवीन दृष्टिकोन मिळत आहे. सोबतच अजय जिरापुरे यांचा धामणगाव रेल्वे तालुक्यात नव्हे तर जिल्हा, राज्यात, राष्ट्रीय स्तरावर त्यांच्या कलेचा वेगळा ठसा उमटवल्याबद्दल, विविध पुरस्कार प्राप्त केल्याबद्दल. याचा सार्थ अभिमान म्हणून या कार्यक्रम सोहळा मध्ये त्यांना तालुका मुख्याध्यापक संघ व प्रमुख अतिथींच्या हस्ते शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

सत्कार सोहळ्यानंतर सर्व सत्कारमूर्तींनी आपले मनोगत व्यक्त केले.. तसेच व्यासपीठावर उपस्थित सर्व मान्यवरांनी सुद्धा आपले मनोगत व्यक्त करून सर्व उपस्थित सत्कारमूर्तींचे अभिनंदन करून धन्यवाद मानले. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक स्व. नंदलाल लोया कन्या विद्यालय, धामणगाव रेल्वेच्या मुख्याध्यापिका अर्चना राऊत यांनी केले. या कार्यक्रमाच्या सूत्रसंचालनाची उत्कृष्ट धुरा माध्यमिक कन्या विद्यालय तळेगाव दशासरच्या मुख्याध्यापिका मंजुषा देशमुख यांनी सांभाळली. तसेच हा कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता उपस्थित सर्वांचे आभार प्रदर्शन से.फ.ला. विद्यालयाचे प्राचार्य प्रशांत शेंडे यांनी मानले. या कार्यक्रमाला धामणगाव तालुक्यातील सर्व शाळांचे मुख्याध्यापक व मुख्याध्यापिका आवर्जून उपस्थित होते.

# वीज यंत्रणेजवळ कचरा जाळू नका; महावितरणचे नागरिकांना आवाहन

## प्रसंगावधानाने मोठी हानी टळली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

गोपाल टॉकीज जवळ,तसेच हॉटेल ग्रेस इन जवळ महावितरणच्या फिडर पीलर जवळ टाकलेल्या कचऱ्याला आग लागली/ लावण्यात आली. प्रसंगावधानामुळे महावितरणची मोठी हानी टळली आणि आगीवर लवकरच नियंत्रण मिळविणे शक्य झाले. त्यामुळे महावितरण यंत्रणेचे मोठे नुकसान झाले नसल्याने वीज पुरवठा सुरळीत ठेवता आला.

वीज वाहिन्या, वितरण रोहीत्र, फीडर पीलर किंवा वितरण पेट्यांजवळ कचरा जाळण्याच्या प्रकारामूळे वीजयंत्रणेला धोका निर्माण होऊन सर्वसामान्य नागरिकांसोबतच विज वितरण कंपनीला नाहक मन:स्ताप सहन करावा लागत असल्याने वीज यंत्रणेजवळ कचरा टाकू नये आणि त्यास जाळूही नये असे आवाहन कार्यकारी अभियंता संजय सराटे यांनी केले आहे.शहरी व ग्रामीण भागात अनेक ठिकाणी वीज वाहिन्या, फिडर पिलर, वितरण रोहित्र, वितरण पेटी किंवा डी.पी. अशा वीज यंत्रणेजवळील उघडयावर असलेल्या जागेत कचरा टाकण्यात येतो. वीज यंत्रणेजवळ साठवलेला हा कचरा पेटविल्याने किंवा इतर कारणामुळे कचरा जळाल्याने विजेच्या भूमिगत केबल व इतर वीजयंत्रणा आगीमुळे नादुरुस्त झाल्याच्या घटना घडल्या आहेत. पर्यायाने संबंधीत परिसरातील वीजपुरवठाही खंडित झालेला आहे. दिवसेंदिवस ऊनाचा पारा वाढत असल्याने कचऱ्यास आग लागण्याचे प्रकार वाढत आहेत.वीज यंत्रणा उन्हामुळे तापलेली असल्याने अशातच अश्या आगीमुळे वीजवितरण यंत्रणेचे तापमान वाढल्यास यंत्रणेला त्याचा फटका बसतो. उपरी वीजवाहिन्याखाली असलेल्या कचऱ्याचा ढीग पेटल्यामुळे किंवा त्याला आग लागल्यामुळे वीजतारा वितळून वीज खंडित होण्याचा धोका अधिक आहे. नागरिकांनी उघडयावर असलेल्या वीजयंत्रणेला धोका निर्माण होईल अशा ठिकाणी कचरा टाकू नये किंवा साठवलेला कचरा जाळू नये. अशा घटनांतून वीज यंत्रणेला आग लागल्याचे आढळल्यास जिल्ह्यासाठी असलेल्या दैनंदिन सनियंत्रण कक्षाच्या ७८७५७६३८७३ या मोबाईल नंबरवर किंवा १८००–२१२ –३४३५ आणि १८००–२३३ –३४३५ या टोल फ्री क्रमांकांवर किंवा नजिकच्या महावितरण कार्यालयाला त्याची सुचना देण्याचे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.



# कन्टेनरमधून ३५ लाखांचा गुटखा जप्त

## दिल्लीतून-अकोला जाणार होता गुटखा ; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

कन्टेरमधून गुटख्याची वाहतूक करणा-या एका आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी तळेगाव-तिवसा हायवेवरील वरखेड रस्त्यावरून ताब्यात घेतले. गुलाब सरमन अहेरवार (वय ४४, रा. गोना, तहसिल पाली, जिल्हा ललितपुर, राज्य उत्तरप्रदेश) असे आरोपीचे नाव आहे. त्याच्या ताब्यातून ३५ लाख रुपये किमंतीचा प्रतिबंधीत गुटखा, कन्टेनर व मोबाईल असा एकुण ७१ लाख ७० हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलिस चौकशीनंतर हा गुटखा माल दिल्लीतून अकोला येथे जात असल्याची माहिती आहे.


अमरावती ग्रामिण पोलिस अधीक्षक विशाल आनंद यांनी प्रतिबंधीत केलेल्या सुंगधित तंबाखुसह गुटखा विक्रेता व वाहतूक करणा-यावर कारवाई करण्याचे सर्व पोलिस ठाणे तसेच स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांना निर्देश दिले होते. या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस १५ एप्रिल रोजी तिवसा हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना, त्यांना गोपनिय माहीती मिळाली की, नागपुरकडून अमरावती-अकोलाकडे एका कन्टेनरमध्ये महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेल्या गुटख्याची अवैधरित्या वाहतुक होत आहे. या माहितीवरून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तळेगाव ते तिवसा हायवेवरील वरखेड जवळ सापळा रचला. त्यावेळी तळेगावकडुन तिवसाकडे एक कंटेनर संशयितरित्या येताना दिसले. त्यामुळे पोलिसांनी कंटेनरला थांबवून पाहणी केली असता कंटेनरमध्ये एक इसम बसुन होता. त्याने त्याचे नाव गुलाब सरमन अहेरवार, असे सांगितले.

त्यानंतर पोलिसांनी कंटेनरची पंचासमक्ष झडती घेऊन गुटख्याचा मुद्देमाल जप्त केला. पोलिसांना कंटेनरमध्ये १०० पोते बहार सुगंधीत पान मसाला व बिएचआर सुगंधीत तंबाखु असा ३६ लाख ६० हजाराचा माल मिळून आला. चालकाची चौकशी केली असता, हा माल दिल्ली येथून आणुन अकोला येथे घेऊन जात असल्याचे गुलाब सरमन अहेरवार याने सांगितले. त्यानंतर पोलिसांनी त्याच्या ताब्यातील गुटखा तसेच वाहतुक करण्याकरीता वापरलेले कंटेनर क्रमांक आरआय ११ जीसी ०३५२, आणि १० हजाराचा स्मार्टफोन असा एकुण ७१ लाख ७० हजाराचा मुद्देमाल जप्त केला.

याप्रकरणात आरोपीविरुध्द तिवसा पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम १२३, २२३, २७४, २७५, ३७५ सहकलम ५९ अन्न सुरक्षा मानके अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे. पुढील तपास तिवसा पोलिस करीत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अप्पर पोलिस अधिक्षक पंकज कुमावत यांच्या मार्गदर्शनात पोलिस निरीक्षक किरण वानखडे यांच्या नेतृत्वात पोलिस उपनिरीक्षक सागर हटवार, मुलचंद भांवुरकर, पोलिस अंमलदार बुद्धवंत दाभणे, रविन्द्र बावणे, भुषण पेठे, मंगेश लकडे, सचीन मसांगे, चालक संजय प्रधान यांनी केली.

# वलगाव येथे वादग्रस्त इंस्टाग्राम पोस्ट वरून मोठा तणाव : अनेक दुकानांची तोडफोड

## डीसीपी सागर पाटील घटनास्थळी दाखल









**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७ वलगाव**

अमरावती तालुक्यातील वलगाव येथे दिनांक १६ रोजी बुधवारी संध्याकाळी आठच्या सुमारास दर्शन मोहोड ७७० या इंस्टाग्राम आयडी वरून आपत्तीजनक पोस्ट करण्यात आली आहे या पोस्टचा स्क्रीन शॉट काढून वलगाव येथील मोन्टु तसरे या युवकाने समता नगर मित्र मंडळ या व्हाट्सअप ग्रुप वर शेअर करण्यात आली या पोस्टमध्ये डाव्या बाजूला मोठा प्रभु श्रीराम यांचा फोटो व सदर फोटोच्या जवळ डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा हात केलेला फोटो व तिथे इंग्लिशमध्ये माय फादर असे लिहिलेले होते चित्राच्या मागच्या बाजूला राजवाड्यासारखी वास्तु दिसुन आली आहे हि सर्व घटना वलगाव येथील बौद्ध धर्मीय बांधवांना माहित पडताच त्यांनी वलगाव पोलीस स्टेशन येथे धाव घेतली व वलगाव पोलिसांना घटनेची माहिती दिली वलगाव पोलिसांनी तात्काळ दर्शन मोहोड ७७० या इंस्टाग्राम आयडी असलेल्या युवकाला ताब्यात घेतले व कसुन चौकशी केली असता मात्र दुसरीकडे वलगाव येथील काही टवाळखोर युवकानी शांती सागर चौकात हातात लाठी काठी घेऊन तोड फोड करायला सुरुवात केली यात दुचाकी चारचाकी ट्रकच्या काचा फोडण्यात आल्या आहे सोबतच लस्सी विक्रेत्यांच्या स्टॉल वरील काचाचे ग्लास देखील फोडण्यात आले आहे आमलेट विक्रेत्याची गाडी देखील पलटी करण्यात आली आहे फळ विक्रीसाठी असलेले दुकान देखील उध्वस्त करण्यात आले आहे हि सर्व घटना पाहुन एक महिला खाली चक्कर येऊन पडली होती मोठ्या प्रमाणात पुरुष व महिलांना शिवीगाळ देखील करण्यात आली आहे हि सर्व घटना वलगाव पोलिसांना माहित पडताच वलगाव पोलीस तात्काळ दंगा नियंत्रण पथकासह घटनास्थळी पोहोचले व जमामावर सौम्य लाठीमार करून जमावाला पागंवले व सर्व आस्थापने बंद केली यावेळी वलगाव येथील समता नगर भिम नगर बालाजी चौक ग्रामपंचायत कार्यालय परिसर अशोक नगर चांदुर बाजार कॉर्नर मुख्य बस स्थानक परिसरात तसेच दर्यापूर अचलपूर कॉर्नर वर या सर्व भागात पोलिसांचा कडेकोट बंदोबस्तात होता या सर्व घटनेचा पुढील तपास वलगाव पोलीस करत आहे.

# 'त्या'तिनही नराधमांना फाशी झालीच पाहिजे

## रवीनगर परिसरातील नागरिक धडकले राजापेठ ठाण्यावर






**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

रवीनगर भागात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती दिनानिमित्त 'शिवजयंती २०२५' हा कार्यक्रम शिवप्रेमी मित्र मंडळाकडून आयोजित करण्यात आला होता. याच मंडळाचा अध्यक्ष असलेल्या २४ वर्षीय तरुणाचा तिघांनी चाकूने वार करून खून केला. या प्रकरणात पोलिसांनी तीन मारेकऱ्यांना अटक केली आहे. आरोपैकि एकाला या मंडळाचा अध्यक्ष व्हायचे होते मात्र तो अध्यक्ष झाला नाही. त्याच कारणातून २४ वर्षीय अध्यक्ष तीर्थ वानखडे असे मृतकाचे नाव असून या प्रकरणात आरोपी असलेल्या तिन्ही आरोपींना फाशीची शिक्षा द्या ही मागणी करीत परिसरतील शेकडो नागरिक आज राजापेठ पोलीस ठाण्यावर धडकले.

निष्पाप जीवाचा बळी घेणाऱ्या चेतन पिंजरकर.सूरज बगेकर,रोशन पिंजरकर यातिन्ही विकृत नराधमांना फाशी झालीच पाहिजे,फाशी झालीच पाहिजे..!अशी मागणी आज एकमुखाने परिसरातील नागरिकांनी केली.गजानन वानखडे व परिवार यांच्या वर एक मोठा दुःखाचा डोंगर कोसळलं त्यांच्या मुलाची निघृण हत्या करण्यात आली.संबंधित आरोपी राजापेठ पोलीस स्टेशन मध्ये या आधी सुद्धा परिसरातील नागरिकांच्या तक्रारी आहेत.संबंधित खटल्या मध्ये राजकीय हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न होत असून असे निर्देशनास आल्यास आपण जातीने लक्ष घालून खबरदारी घ्यावी. आमच्या माध्यमातून कोणत्याही प्रकारचा उग्रपणा निर्माण होणार नाही.अशी मागणी ही निवेदनाच्या माध्यमातून करण्यात आली आहे.या वेळी डीसीपी शिंदे यांनी सर्व नागरिकांना आशवस्त केले.सदर निवेदन देती वेळी गजानन वानखडे,नारायण कावरे,मोहन वानखडे,सुरेंद्र मावळे,नितीन वाटणकर, हिरालाल चक्र,सुभाष किल्लेकर,निकेश झाडे,कुशल तुरणकर श परिसरातील शेकडो नागरिक उपिस्थत होते.

# मा.खा.नवनित रवि राणा यांच्या अथक प्रयत्नाने बडनेरा नाशिक रोड मेमु गाडिच्या वेळेमध्ये बदल

## शेगाव व नाशिक येथे जाणाऱ्या हजारो नागरिकांनी विशेषत : महिलांनी मानले आभार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

आपल्या खासदारकीच्या कार्यकाळात अमरावती जिल्ह्यातील अनेक प्रकल्प पुर्णत्वास नेणाऱ्या मा.खा.नवनित रवि राणा यांनी अमरावती रेल्वे स्टेशन तसेच बडनेरा रेल्वे स्टेशन वरुन जाणाऱ्या अनेक गाड्यांचा थांबा बडनेरा व अमरावती येथे दिला असुन त्याचप्रमाणे नवीन गाड्या सुद्धा अमरावती व बडनेरा रेल्वे स्टेशन वरुन मा.खा.नवनित रवि राणा यांच्या प्रयत्नाने सुरु झाल्या. या अनुषंगानेच बडनेरा नाशिक रोड मेमु गाडी बडनेरा वरुन सकाळी ११ वाजुन ५ मिनिटाला निघायची त्यामुळे शेगावकडे जाणाऱ्या अनेक भाविक भक्तांना शेगाव पोहचायला उशिर होत होता. त्यामुळे शेगाव वरुन यायला रात्रीचा उशीर सुद्धा होत होता. तसेच बडनेरा ते नाशिकपर्यंत नियमीत प्रवासी असुन विशेषत: नोकरदार वर्ग, विद्यार्थी व विशेषत: महिला वर्ग या हजारोच्या संख्येने प्रवास करित असतात. त्यामुळे गाडीची वेळ १ तास आधी सुरु करावी याकरिता सर्व प्रवासी मंच व नागरिकांनी मा.खा.नवनित रवि राणा यांच्याकडे निवेदन देत मागणी केली होती. त्यामुळे सर्व प्रवाशांना होणारा त्रास बघता मा.खा.नवनित रवि राणा यांनी रेल्वे प्रशासनाकडे अथक प्रयत्न करुन बडनेरा वरुन ११ वाजुन ५ मिनिटांनी निघणारी बडनेरा नाशिक मेमु ट्रेन आता सकाळी १० वाजुन ५ मिनिटांनी निघणार असल्याचे परिपत्रक रेल्वे प्रशासनाद्वारे काढुन गाडी सकाळी १० वाजुन ५ मिनिटांनी सुरु करण्यात आली. त्यामुळे प्रवाशी, नागरिक, विद्यार्थी व विशेषत: महिला वर्गाद्वारे मा.खा.नवनित रवि राणा यांचा जाहीर सत्कार करुन आभार व्यक्त करण्यात आला. यावेळी राज्यसभेचे खासदार डॉ.अनिल बोंडे, तसेच प्रवाशी मंचचे पदाधिकारी सुभाष बाळे, डॉ.शैलेश जयस्वाल, डॉ.दिलीप सुर्यवंशी, बलगोविंद राठी, प्रा.चंद्रशेखर शेळके, डॉ.वनिता भोपत, डॉ.रोहित अग्रवाल, प्रा.आनंद पांडे, महेंद्र पिटे आदि उपस्थित होते.

# महाराष्ट्राला महसूल नाही, मप्र मधील मुरूमांचे ट्रक महाराष्ट्रात कसे ?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७ परतवाडा**

अचलपूर महसूल मंडळामध्ये मध्यप्रदेश मधून मुरूम आणणाऱ्या तस्करांची बल्ले बल्ले जोमात सुरू आहे , चांदूर बाजार व अचलपूर तहसील लगत मध्य प्रदेश राज्यामध्ये येणाऱ्या धापोळा येथील मुरूम खदानी वरून तस्करी करणाऱ्या मुरूम तस्करांनी चांगलाच हैदोस घातला आहे , मध्य प्रदेश मधील बैतूल खनिक्रम विभागाने दिलेल्या रॉयल्टीच्या नावावर चक्क परतवाडा , अचलपूर व चांदूरबाजार तहसील क्षेत्रामध्ये महसूल व पोलीस प्रशासनाच्या डोळ्यासमोर ओवरलोड ट्रकांची जीवघेणी वाहतूक सुरू आहे , खरपी वरुन वाहतूक करणाऱ्या या ओव्हरलोड मुरूमच्या ट्रकांवरती क्षेत्रीय मंडळ अधिकारी व महसूल प्रशासन कानाडोळा करीत आहे , रॉयल्टी एक तर ट्रीप , अनेक अशा पद्धतीने हे ओव्हरलोड मुरुमाचे ट्रक दिवसभर धावत आहे , मध्यप्रदेश मधील रॉयल्टीला तपासणार कोण याचाच फायदा घेत ऑनलाइन रॉयल्टीच्या नावावर दिवसाढवळ मुरुमाची तस्करी महसूल प्रशासनाच्या समोर होत आहे तर दुसरीकडे बैतूल जिल्ह्यातील भैसदही उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांचे पथक लापता असून महाराष्ट्राची सीमा ओलांडून धापोळा येथील खदानीची तपासणी करण्यासाठी असक्षम असल्यामुळे रॉयल्टी धारक चालक-मालकाने मुरुमाची तस्करी करण्यासाठी पुष्पा चित्रपटांमधील झुकेगा नही साला सारखी भूमिका घेतली आहे.

नायब तहसील दारांचे नाव चर्चेतमध्य प्रदेश राज्यामध्ये येणाऱ्या धापोळा येथील मुरूमच्या रॉयल्टी धारक चालक-मालकासोबत संगणमत करून हप्ता देण्याची कबुली बोली करुन मुरुम तस्कराने कोणाला न घाबरता ओवरलोड मुरुमाच्या ट्रकांची वाहतूक सुरू केली आहे , यावर आशीर्वाद म्हणून नयाब तहसीलदाराने भूमिका घेतल्यामुळे मुरूम तस्कराची हिम्मत चांगलीच वाढण्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगली आहे , हा नयाब तहसीलदार कोण याचा शोध घेणे गरजेचे झाले आहे.



# खेलो मास्टर गेम्स २०२५ मध्ये ग्राम महसूल अधिकारी दिनेश ठाकरे यांची भरारी

## श्रीलंका येथे होणाऱ्या सीनियर चॅम्पियनशिप साठी नामांकन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७धामणगाव रेल्वे**

दिल्लीत आयोजित चतुर्थ खेलो मास्टर गेम्स २०२५ या स्पर्धेमध्ये तालुक्यातील भातकुली ग्राम महसूल अधिकारी दिनेश मारोतराव ठाकरे यांनी अभूतपूर्व यश संपादन केले असून श्रीलंका येथे होणाऱ्या सीनियर चॅम्पियनशिप साठी नामांकन झाले आहे.याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

दिल्लीत आयोजित चतुर्थ खेलो मास्टर गेम्स २०२५ या स्पर्धेमध्ये तालुक्यातील श्री दिनेश मारोतराव ठाकरे यांनी १ हजार ५००मीटर व ३ हजार मीटर रनिंग स्पर्धेमध्ये तिसरा क्रमांक पटकावून कास्यपदक प्राप्त केले. प्रधानमंत्री मोदी यांच्या फिट इंडिया या संदेशाला प्रभावित होऊन ३५ वर्षांवरील खेळाडू यांना स्वस्त राहण्याच्या उद्देशाने खेलो मास्टर गेम्स फाउंडेशन तर्फे ११ ते १३ एप्रिल दरम्यान दिल्ली येथे कॉमनवेल्थ व्हिलेज मध्ये खेळाचे आयोजन करण्यात आलेले होते. ज्याचे उद्घाटन भाजप दिल्लीचे प्रदेशाध्यक्ष वीरेंद्र सचदेवा यांनी केले.२५ राज्यातील जवळपास तीन हजार स्पर्धकांनी सदर स्पर्धेमध्ये भाग घेतलेला होता. दिनेश ठाकरे हे मूळचे निंबोली येथील असून भातकुली येथे ग्राम महसूल अधिकारी म्हणून कार्यरत आहे.त्यांनी वयोगट ३५ ते ४० मध्ये तीन हजार मीटर व एक हजार पाचशे मीटर रनिंग स्पर्धेमध्ये तिसरा क्रमांक पटकावून कांस्यपदक मिळविलेले आहे.श्रीलंका येथे होणाऱ्या सीनियर चॅम्पियनशिप साठी आपले स्थान निश्चित केलेले आहे. त्याचप्रमाणे समीर देशमुख राहणार अमरावती व जुबेर शेख यांनी थाळीफेक व गोलाफेक मध्ये रोप्य पदक मिळवून आपले स्थान निश्चित केलेले आहेत.

# विद्यापीठाच्या पीएचडी ॲप्टीट्यूड टेस्ट परीक्षेच्या अर्जासाठी २३ पर्यंत मुदत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाद्वारे आचार्य पद्वीकरिता प्रवेश घेणाऱ्यांना सर्वप्रथम पीएचडी ॲप्टीट्यूड टेस्ट/पेट ही परीक्षा द्यावी लागते. या परीक्षेचे अर्ज आता विद्यापीठाच्या 'पेट' साठी रख एप्रिलपर्यंत मुदतवाढ २३ एप्रिलपर्यंत भरता येतील. पूर्वी ही मुदत १५ एप्रिलपर्यंतच होती. पद्व्युत्तर पदवी घेतल्यानंतर संशोधन करु इच्छिणा-या संशोधक विद्यार्थ्यांना आचार्य पदवीसाठी प्रवेश घेता येतो. मात्र त्यापूर्वी त्यांना एक पूर्वपरीक्षा द्यावी लागते. ही पूर्व परीक्षा येत्या काळात घेण्यात येईल. दरम्यान त्या परीक्षेसाठी संबंधितांना आपले अर्ज २३ एप्रिलपूर्वी ऑनलाईन सादर करावे लागतील. त्यासाठी १५ एप्रिल ही अंतिम तिथी निश्चित करण्यात आली होती. परंतु अनेक विद्यार्थ्यांच्या अडचणी लक्षात घेता आचार्य पदवी प्रवेश परीक्षा समितीने २३ एप्रिलपर्यंत मुदतवाढ दिल्याचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी यांनी कळवले आहे.